सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १२ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक २८ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर; राजनाथ सिंहांच्या अध्यक्षतेखालील दीड तास बैठक

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : मध्य पूर्वेतील (पश्चिम आशिया) वाढत्या संघर्षाचे पडसाद संपूर्ण जगभरात उमटत असताना, भारत सरकारने संभाव्य धोके ओळखून अत्यंत सावधगिरीची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.




देशांतर्गत परिस्थिती आणि पुरवठा साखळी स्थिर ठेवण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी एका 'अनौपचारिक अधिकार प्राप्त मंत्रिगटाची' एक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. सुमारे दीड तास सखोल चर्चा झालेल्या या बैठकीत प्रामुख्याने देशाची ऊर्जा सुरक्षा आणि सर्वसामान्यांसाठी आवश्यक असलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेवर लक्ष केंद्रित करण्यात आले. या उच्चस्तरीय बैठकीला केंद्रीय आरोग्य व रसायन-खते मंत्री जे. पी. नड्डा, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिज यांच्यासह सरकारमधील अनेक महत्त्वाचे मंत्री उपस्थित होते. परदेशातील युद्धजन्य स्थितीमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला बसू शकणाऱ्या संभाव्य धक्क्यांचा या वेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत होणाऱ्या अनपेक्षित वाढीचा थेट परिणाम भारतीय बाजारपेठेवर होऊ नये, यासाठी या बैठकीत महत्त्वपूर्ण धोरणांवर चर्चा झाली. देशात घरगुती वापराचा एलपीजी गॅस, वाहनांसाठी लागणारे पेट्रोल-डिझेल आणि कृषी क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या खतांचा कोणताही तुटवडा निर्माण होऊ नये, यासाठी तातडीच्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. बैठकीनंतर माध्यमांना माहिती देताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी स्पष्ट केले की, पश्र्चिम आशियातील सद्यस्थितीमुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची दाट शक्यता असली तरी, देशांतर्गत पातळीवर कोणतीही कमतरता भासू नये याची पूर्ण काळजी घेतली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सज्ज असून, पुरवठा साखळी अबाधित ठेवण्यासाठी सर्व यंत्रणा अतिशय प्रभावीपणे काम करत आहेत.

जागतिक पातळीवर तणाव असला तरी देशातील नागरिकांनी विनाकारण घाबरून जाऊन वस्तूंची साठेबाजी करू नये, असे आवाहन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले आहे. परदेशातून येणाऱ्या पुरवठा साखळीत कोणताही मोठा अडथळा येऊ नये, यासाठी सरकारने आधीच ठोस आणि पर्यायी व्यवस्था निर्माण केली आहे. या जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी केवळ सरकारी प्रयत्नांवर विसंबून न राहता लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पंतप्रधान मोदींनी दिलेला 'आत्मनिर्भर भारत' आणि 'ऊर्जा सुरक्षा' यांचा मंत्र या आव्हानात्मक काळात भारताची ढाल बनेल, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

या महत्त्वपूर्ण बैठकीच्या एक दिवस आधी, रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशाला संबोधित करताना वाढत्या जागतिक तणावाचा संदर्भ देत इंधन बचतीचे अत्यंत मोलाचे आवाहन केले होते. नागरिकांनी इंधनाची बचत करण्यासाठी वैयक्तिक वाहनांऐवजी मेट्रो आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीत जास्त वापर करावा, एकाच मार्गावर जाणाऱ्यांनी 'कारपूलिंग'चा पर्याय निवडावा आणि मालवाहतुकीसाठी रस्ते वाहतुकीऐवजी रेल्वेचा अधिकाधिक वापर करावा, अशा सूचना पंतप्रधानांनी केल्या. याशिवाय, प्रदूषणमुक्त आणि इंधनावरील अवलंबित्व कमी करणाऱ्या 'इलेक्ट्रिक वाहनांच्या' (एत) वापराला प्रोत्साहन देण्याचेही त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले की, अशा जागतिक संकटाच्या वेळी देशाची अर्थव्यवस्था मजबूत ठेवणे ही केवळ सरकारची जबाबदारी नसून ती संपूर्ण देशाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येकाने आपल्या परीने इंधन वाचवून जबाबदारीने वागल्यास देशाची आर्थिक ताकद अधिक भक्कम होईल.

## इराण जागतिक डिजिटल शटडाऊन लादण्याच्या तयारीत

तेहरान : होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर टॅक्स लावल्यानंतर इराण आता डिजिटल डेटावर कर आकारणीची तयारी करत आहे, ज्याला मोजताब खामेनींचा 'ट्रिलियन-डॉलरचा डाव' म्हटलं जात आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याचा हवाला देत इराणला पाण्याखालील इंटरनेट केबल्समधून दररोज जाणाऱ्या अब्जावधी डॉलर्स किमतीच्या आर्थिक डेटावर शुल्क आकारायचे आहे, नाहीतर इराणने केबल्स कापण्याची धमकी दिली आहे.



खीरप खठऋउ झश्ररप ीं ढरज्ञर्शेींशी उळसळींरश्र उत्रींर उरलश्रशी ीपवशी वेींीू डींरळीं

खीरप थरी: इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यातील संघर्षाला दोन महिन्यांहून अधिक काळ लोटला असून यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यासाठी महत्त्वाचा मार्ग - होर्मुझ सामुद्रधुनी - ची नाकेबंदीही सुरू आहे परिणामी, जागतिक तेल संकट अधिकच गडद झाले आहे. तर या दरम्यान, आता होर्मुझवरून एक नवीन डिजिटल युद्ध सुरू होण्याचे संकेत मिळत आहेत.

पश्र्चिम आशियातील संघर्षामुळे सध्या होर्मुझ सामुद्रधुनीवर 'डबल' नाकेबंदी सुरू आहे. एकीकडे इराण आहे, ज्याच्या परवानगीशिवाय जहाजांना येथून जाण्याची वाट मिळत नाही तर दुसरीकडे, ट्रम्प यांच्या अमेरिकी नौदलाची नाकेबंदी आहे, जे इराणी जहाजांची वाट रोखून आहेत. तेल विकता येत नसल्यामुळे इराणला मोठे नुकसान होत आहे, ज्याची भरपाई आतापर्यंत होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर टोल कर आकारून करत होता पण, आता इराण त्यातून जाणाऱ्या डिजिटल डेटावर कर लावण्याची तयारी करत आहे, ज्याला मोजताब खामेनींचा 'ट्रिलियन-डॉलर' डाव मानला जात आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीवर इराणचे नियंत्रण असून अमेरिकेशी आणखी एक युद्ध करावे लागले तरीही, अरबी समुद्रातील हा अरुंद पट्टा कोणत्याही परिस्थितीत सोडायला मोजतबा तयार नाहीत. या भागातून जाणारी जहाजे केवळ इराणच्या परवानगीने आणि टोल कर भरूनच जाऊ शकतात. इराण टोल टॅक्सच्या माध्यमातून प्रचंड नफा कमावत आहे, पण आता होर्मुझमधून मिळणारी कमाई अनेक पटींनी वाढू शकते आणि तेलानंतर इराणचा डिजिटल ब्लॉक याला कारणीभूत ठरू शकते.

७ प्रमुख सागरी फायबर-ऑप्टिक केबल्सवर पूर्ण नियंत्रण मिळवण्यासाठी इराणने एक व्यापक आदेश जारी केला आहे, ज्यामुळे चिंता वाढली आहे कारण या केबल्समधून दररोज १० ट्रिलियन डॉलर्सचे जागतिक आर्थिक व्यवहार होतात.

अशा परिस्थितीत, इराणच्या या निर्णयामुळे जगातील सर्वात महत्त्वाचा ऊर्जा मार्ग - होर्मुझ सामुद्रधुनी - नवीन 'डिजिटल चोकपॉइंट' बनू शकतो. इराणी रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स म्हणजे खठऋउ ने 'आता परदेशी कंपन्यांना समुद्राच्या तळावरील पायाभूत सुविधांची देखभाल करण्यासाठी इराणी परवानग्या मिळवाव्या लागतील आणि संरक्षण शुल्क भरावे लागेल', असे जाहीर केले आहे.




10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | Flipkart | amazon.in

*नियम आणि अटी लागू. बचत निवडक मॉडेल्सवर 27 एप्रिल पासून 31 मे 2026 पर्यंत उपलब्ध. लागू ऑफर्स ह्या मॉडेल्स/राज्यांनुसार बदलू शकतात. ई–कॉम ऑफर्स संबंधित ई–कॉम पार्टनरच्या अटींच्या अधीन. ई–कॉम ऑफर्स पार्टनर्सनुसार बदलू शकतात. दाखवलेले ईएसआरपीज बेस वेरिएंटचे. ऑफर्सच्या अधिक माहितीसाठी कृपया जवळच्या डीलरशिपकडे भेट द्या. पल्सर 125 निऑनवर ₹2 000/– सूट.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Shivratna Bajaj 8975888188, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सकाळी उन्हाचा तडाखा, दुपारी वाढतोय धगाटा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ११ मे : जिल्ह्यात बदलत्या वातावरणाचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे. सकाळच्या प्रहरी प्रखर उन्हाचा सामना करावा लागत आहे. दुपारनंतर ढगाळ वातावरणाने धगाटा वाढला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार गेल्या आठवड्यात जिल्ह्यात तुरळक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. त्यानंतर वातावरणात गारवा आला होता. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून पुन्हा उन्हात वाढ झाली आहे. दिवस उजाडताच ऊन पडत असून दुपारनंतर ढगाळ वातावरणाने नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होत आहे. या बदलत्या वातावरणाचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

रुग्णालयांमध्ये लहान बालके आणि ज्येष्ठ नागरिकांची गर्दी होत आहे. यामुळे लहान मुलांची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.



## विविध वृत्त...

### पोलिस अधीक्षक कार्यालयात अडीच कोटींचा गैरव्यवहार

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ मे : जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील वेतन वितरण प्रक्रियेमध्ये अर्थिक अनियमितता प्रकरणी प्राथमिक चौकशीत आरोपींनी मे २०१५ ते मार्च २०२५ या कालावधीत संगणमत करून अप्रमाणिकपणे शासनाच्या रकमेचा अपहार करण्याच्या उद्देशाने वेतन अभिलेखांमध्ये खाडाखोड करून, बनावट दस्तऐवज तयार करून व त्याचा गैरवापर करून इन्सेंनटिव्ह, बेसिक ईरीयस, स्पेशल पे व इतर वेतन शिर्षकांखाली अनधिकृतरीत्या जास्तीची रक्कम अदा करून व जास्तीचे अदा केलेल्या रकमेतून स्वत: करिता स्वत:चे बँक खात्यावर रक्कम स्वीकारून २ कोटी ३८ लाख ९२ हजार ७ इतक्या शासकीय रकमेचा अपहार केल्याचा आरोप आहे. आरोपी लिपिक राहुल गोविंदराव वागदरे, ब्रिजकिशोर ठाकूर, दत्तात्रय मारुती क्षिरसागर व श्रेणी पोलीस उपनिरीक्षक अजय दिगंबर सूर्यवंशी या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**सदर गुन्ह्यातील तीन आरोपींना तात्काळ अटक करून न्यायालय समक्ष हजर केले असता सदर आरोपींची न्यायालयाने १६ मेपर्यंत तपासकामी पोलिस कोठडी मंजूर केली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास लातूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे हे करीत आहेत.**

### जिल्ह्यात ३५ खासगी विहिरी, विंधन विहिरींचे अधिग्रहण

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. ११ मे : जिल्ह्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने पाणी टंचाई निवारण आराखड्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या ७ मे रोजीच्या दैनंदिन अहवालानुसार, सध्या जिल्ह्यातील जळकोट तालुक्यात २ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच जिल्ह्यात ३५ विहीर, विंधन विहीर अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.**

**जळकोट तालुक्यातील ३ गावे आणि १ वाडी मिळून ३,३१० लोकसंख्येला २ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये शिवाजी नगर तांडा व वाघमारी तांडा येथे टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. गव्हाण येथेही २४ एप्रिल २०२६ पासून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. यासाठी २ शासकीय टँकरद्वारे दररोज ४ खेपा पूर्ण केल्या जात आहेत.**

**टँकर व्यतिरिक्त ज्या ठिकाणी शक्य आहे, तिथे प्रशासनाने खाजगी विहिरींचे अधिग्रहण करून पाणीपुरवठा स–रू केला आहे. जिल्हभरात ३५ खाजगी विहिरी, विंधन विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यामध्ये औसा तालुक्यातील १० गावे तथा वाड्यांसाठी ११ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत, तर अहमदपूर तालुक्यातील १० गावांमध्ये १० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.**

**उदगीर तालुक्यात ८ गावे तथा वाड्यांसाठी ८ विहिरी अधिग्रहित केल्या आ–हेत. रेणापूर व चाकूर तालुक्यात प्रत्येकी १ गावात विहीर अधिग्रहण करण्यात आले आ–हे, तर जळकोट तालुक्यात टँकर भरण्यासाठी ३ आणि इतर २ अशा एकूण ५ विहिरी अधिग्रहित केल्या आहेत.**

### बोगस शाळांचा शोध शिक्षण विभाग घेणार का?

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ११ मे : मागच्या दीड-दोन वर्षांत जिल्ह्यात दोन-तीन बोगस शाळा आढळून आल्या. या बोगस शाळांवर लातूरच्या माध्यमिक शिक्षण विभागाने कारवाई केली. आता शाळा सुरू होण्यास फक्त महिना उरला आहे. या महिनाभरात माध्यमिक शिक्षण विभाग बोगस शाळांचा शोध घेणार का? असा सवाल आहे.

विशेषतः बोगस शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत. शोध घेतल्यास मराठी माध्यमाच्या देखील बोगस शाळा सापडतील, असा शिक्षणप्रेमींचा व्होरा आहे. या पार्श्र्वभूमीवर, माध्यमिक शिक्षण विभाग काय मोड घेणार, यावर बरेच अवलंबून असणार आहे. सध्या शहरातील गल्लीबोळात, ग्रामीण भागात सुद्धा बहुसंख्येने इंग्रजी माध्यमाच्या शाळा, नर्सरी सुरू आहेत. पालक रितसर व्यवस्थित चौकशी करून आपल्या पाल्यास प्रवेश देताना त्या शाळेची शासन मान्यता आहे की नाही, हे पाहात नाहीत. कोणी तरी कारवाईची मागणी केल्यानंतर पालकांचे डोळे उघडतात. लातूर शहर हे शिक्षणाची पंढरी आहे. येथे प्रत्येक शाळा म्हणजे ती खरीच असते, असा दृढ विश्र्वास पालकांत असतो. परंतु, जेथे शिक्षण तेथेच बोगसपणाही असतो, हे ओळखले पाहिजे. माध्यमिक शिक्षण विभागाने आताच या मे महिन्यात सर्व्हे करून बोगस शाळांचा शोध घ्यावा. ऐन प्रवेश प्रक्रियेत शोध घेणे शक्य नाही. बोगस शाळा अधिकृत जाहीर करणे गरजेचे आहे.

## अतिक्रमण पुन्हा ' जैसे थे ' झाल्यास खर्चाची वसुली संबंधितांकडून करावी !

### लातूरच्या सुजाण नागरिकांतून व्यक्त केले जाणारे मत मनपा प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ११ मे : लातूर शहरात महानगर पालिका प्रशासनाकडून आतापर्यंत अनेकदा शहराच्या गंज गोलाईसह अनेक ठिकाणचे अतिक्रमण हटविण्याचे प्रयत्न झाले. अनेकवेळा हटविण्यात आलेले अतिक्रमण पुन्हा काही तास , दिवसानंतर ' जैसे थे ' झाल्याची अनेक उदाहरणे आ-हेत. त्यामुळे यापुढे असा प्रकार घडल्यास अतिक्रमण हटविण्यासाठी मनपा प्रशासनाला जो खर्च आला आहे, तो संबंधित अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वसूल केला जावा,असा मतप्रवाह लातूरच्या सामान्य, सुजाण नागरीकातून व्यक्त होत आहे. याकडे मनपा प्रशास-नानेही गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता वर्तवली जात आहे.



लातूर शहरातील मुख्यतः गंज गोलाईतील अतिक्रमण हा कायम कळीचा मुद्दा राहिला आहे. शहरात नपा अस्तित्व-ात असताना आणि आता नपा चे मनपात रुपांतर झालेले असतानाही हा प्रश्र्न सातत्याने तसाच प्रलंबित राहत आला आहे. नागरीकातून अतिक्रमण हटविण्याची मागणी वाढली, ओरड सुरु झाली की, रडक्याचे डोळे पुसल्यागत अतिक्रमण हटावचा प्रयत्न केला जातो. याला आता खरोखर प्रयत्न म्हणायचे की ' फार्स ' असा प्रश्र्न पडल्यास नवल वाटू नये. यशस्वी न होणाऱ्या बाबींना प्रयत्नाऐवजी फार्स शब्द प्रयोग उपयोगात आणणेच योग्य आहे, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे ठरू नये. अतिक्रमण काढण्यासाठी जाणाऱ्या मनपा पथकात आयुक्त - उपायुक्तांसह अनेक अधिकारी - कर्मचाऱ्यांचा लवाजमा असतो. त्याकरिता अतिक्रमण विभागाच्या गाड्या, कर्मचारी तसेच प्रसंगी स्वतंत्र पोलीस बळाचीही आवश्यकता भासते. तेव्हा त्यासाठी मनपा प्रशासनाला मनपाच्या तिज-ोरीतून खर्च करावा लागतो. प्रशासकीय कामकाजासाठी आर्थिक तरतूद असते, नाही असे नाही. मात्र, ज्या कामासाठी पैसे खर्च केले गेले आहेत किंवा खर्च करण्यात येत आहेत, ते काम जर यशस्वी नाही झाले तर ? असा प्रश्र्न कोणाही सुजाण नागरिकाच्या मनात निर्माण होऊ शकतो. आतापर्यंत शहरात अनेकदा अतिक्रमण काढण्याच्या घटना घडल्या आहेत. त्याचे वास्तव काय आहे तर कालांतराने काढण्यात आलेले अतिक्रमण ठराविक काळानंतर ' जैसे थे ' झाल्याचे पाहण्यात आले आहे.

अतिक्रमण कायम स्वरूपी हटविण्यासाठी अतिक्रमण करून व्यवसाय थाटणाऱ्या विक्रेते - छोट्या व्यापाऱ्यांना मनपा प्रशासनाने पर्यायी जागा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्याशिवाय हा प्रश्र्न कायमसाठी सुटणे अशक्य आहे. हटविण्यात आलेले अतिक्रमण मनपाच्या काही कनिष्ठ कर्मचाऱ्यांमुळेही 'अर्थपूर्ण ' व्यवहारातून पूर्ववत होत असल्याचा आरोप केला जात आहे. याचाच अर्थ काही कर्मचारी चिरीमिरी घेऊन अतिक्रमण हटाव मोहिमेला खो देण्याचे काम करत असल्याचा संशयही व्यक्त केला जात आहे. अनेक बाबी वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून लपविण्यात येत असल्याचेच यावरून निदर्शनास येते. मनपाच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांशिवाय काही नगरसेवक, राजकारणी मंडळीही आपल्या जवळच्या मंडळींना अतिक्रमण करू देण्यास सहकार्य करत असल्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळेही अतिक्रमणाच्या माध्यमातून शहराचे विद्रुपीकरण होताना पाहावयास मिळते. लातूरच्या गंज गोलाईला ऐतिहासिक वारसा आहे. नवी दिल्लीच्या कॅनॉट प्लेसची प्रतिकृती असणाऱ्या गंज गोलाईला शंभर वर्षे उलटून गेली आ-हेत. शहराच्या सौंदर्यात कमालीची भर घालण्याचे काम गंज गोलाईमुळे होत असले तरी तूर्तास गोलाई अतिक्रमणाच्या विळख्यात सापडल्याचे पहायाला मिळते. येणाऱ्या काळात गंज गोलाईतील अतिक्रमण काढले गेले आणि ते पुन्हा पूर्ववत झाले तर त्यासाठी करण्यात आलेला खर्च संबंधित अधिकारी - कर्मचाऱ्यांकडून वसूल केला जावा,असा मतप्रवाह वाढिसलागला आहे. याकडे मनपा प्रशासनाने गांभीर्याने पाहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मतभेद बाजूला ठेऊन विकासाला प्राधान्य द्या : आ. अमित देशमुख

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ११ मे : निवडणुकीपुरते राजकारण आणि त्यानंतर केवळ समाजकारण ही लोकनेते विल-ासराव देशमुख यांची शिकवण आहे. महापालिकेची निवडणूक आणि पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया आत्ता पूर्ण झाली असून, नूतन पदाधिकाऱ्यांनी व नगरसेवकांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र यावे, असे आ-वाहन माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.




लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे नूतन सभापती सचिन बंडापल्ले यांनी दि. ९ रोजी रात्री आयोजित केलेल्या स्नेहमिलन कार्यक्रमात माजी मंत्री, आमदार अमित देशमुख बोलत होते. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, माजी महापौर ॲड, दीपक सूळ, ॲड. किरण जाधव, मनपातील सभागृहनेते विजयकुमार साबदे, ॲड. समद पटेल उपस्थित होते.

यावेळी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक व पदाधिका-यांशी संवाद साधताना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख म्हणाले की, हा आपला आणि तो परका असा भेदभाव न करता विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनाही सोबत घेऊन जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा. कल्पक योजनांच्या माध्यमातून शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी नूतन पदाधिकाऱ्यांनी प्रयत्नशील राहावे.

स्नेहमिलन कार्यक्रमाच्या निमित्ताने माजी मंत्री, आमदार देशमुख यांनी शहरातील विविध प्रभागांतील समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी भविष्यात राबवायच्या योजनांबाबत उपस्थित नगरसेवकांशी विचारविनिमय केला. अत्यंत सुसंवादपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाबद्दल त्यांनी सचिन बंडापल्ले यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील यशस्वी कारकि दर्दीसाठी शुभेच्छा दिल्या,

यावेळी बोलताना खासदार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले, आजचा हा स्नेह भेटीचा कार्यक्रम म्हणजे एक कौटुंबिक सोहळा असून आमच्या कुटुंबाचे बंडापल्ले परिवारासोबत गेली कित्येक वर्ष जिव्हाळ्याचे ऋणानुबंध असून सचिन बंडापल्ले यांची निवड अतिशय सार्थ आहे.

येणाऱ्या काळात त्यांच्याकडून उत्तम काम होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी बोलताना सचिन बंडापल्ले म्हणाले, आज या ठिकाणी मनपा निवडणुकीनंतर हा पहिलाच नव नियुक्त मनपा सदस्याचा स्नेह भेट कार्यक्रमाकरिता आपण एकत्र आलो असून स्नेह भेटच्या रूपाने आयोजित केलेला हा कौटुंबिक कार्यक्रम असून या निमित्ताने काँग्रेस व वचित बहुजन आघाडीचे मनपा सदस्य एकत्रित येऊन लातूरच्या विविध विषयावर चर्चा व्हावी, विचारविनिमय व्ह-ावा हा उद्देश असून आमच्यावर दिलेली जबाबदारी प्रामाणिकपने पार पाडू, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

## ज्ञानेश्वर विद्यालयाचा 'स्पोर्टस् समर कॅम्प' सुरू



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ११ मे : ज्ञानेश्वर विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्पोर्टस् समर कॅम्पचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी क्रीडा ध्वज फडकावून कॅम्पची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उल्हास भोयरेकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून येलगट्टे श्रीराम उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना उल्हास भोयरेकर यांनी ज्ञानेश्र्वर विद्यालयाने क्रीडा क्षेत्रात केलेली उल्लेखनीय कामगिरी अधोरेखित केली. विद्यालयाचा हा आगळावेगळा क्रीडा पॅटर्न निश्र्चितच प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला लातूर सायकलिस्ट क्लबचे सतिश खोबरे, विकास कातपुरे, गणेश हाके, विवेक नरहरे, शाम शेटे तसेच ज्येष्ठ माजी शिक्षक शेरखाने आणि क्रीडा शिक्षक बुरगे समाधान यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यालयाचे प्राचार्य संजय मलवाडे यांनी आपल्या मनोगतात संस्थेचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, उपाध्यक्ष प्रल्हादराव दुडीले, सचिव डी. एन. शेळके, सहसचिव विठ्ठलराव झगे, डॉ. सोपानराव जटाळ आणि प्रा. प्रकाशराव शिंगडे यांच्या मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे संस्थेची सर्व क्षेत्रात प्रगती होत असल्याचे नमूद केले. सूत्रसंचालन दिपक गायकवाड यांनी केले. आभार बालाजी फड यांनी मानले. यावेळी विद्यालयाचे लिपीक पस्तापुरे, हिप्परगेकर, भाग्यश्री गुणाले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. समर कॅम्पमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रेम वाढून त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाला चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संशोधनास प्रथम पुरस्कार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ११ मे : इंडियन प्रोस्थोडोंटिक सोसायटीच्या वती-ने नुकत्याच घेण्यात आलेल्या २८ व्या राष्ट्रीय प्रोस्थोडोंटिक अधिवेशनात एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागातील एम. डी. एस. पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. सागरिका मिसाळ, डॉ. अव्दैता आवाळे व डॉ. श्र्वेता मिश्रा यांच्या संशोधनास प्रथम पारितोषिक मिळाले आहे. या यशाबद्दल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते सर्व विजेत्या संशोधकांचा गौरव करण्यात आला.



बेळगांव येथे पार पडलेल्या तीन दिवसीय राष्ट्रीय प्रोस्थोडोंटिक्स अधिवेशनातील दुसऱ्या सत्रात डॉ. सागरिका मिसाळ आणि डॉ. अव्दैता आवाळे यांनी सुरक्षित प्टेरीगॉइड इम्प्लांट बसविण्यासाठी प्टेरीगोमॅक्सिलरी जंक्शन व मॅक्सिलरी ट्युबेरोसिटी यांचा त्रिमितीय अभ्यास

या विषयावर सादर केलेल्या शोध निबंधास प्रथम पारितोषिक मिळाले. त्याचबरोबर तिसऱ्या सत्रात डॉ. श्र्वेता मिश्रा यांनी 'चेहऱ्यावरील संदर्भ रेषांमध्ये विसंगती असल्यास ऑक्लूजल प्लेन निश्र्चितीसाठी चिकित्सीय मार्गदर्शक कार्यपद्धती' या विषयावर सादर केलेल्या शोध निबंधासही प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

या परिषदेत राष्ट्रीय स्तरावरील विविध शैक्षणिक व्याख्याने, थेट प्रात्यक्षिक, रिसर्च पेपर, रिसर्च

पोस्टर व टेबल क्लिनिक अशा स्पर्धक उपक्रमांचा समावेश होता. परिषदेतील विजेत्या सर्व संशोधकांचा मान्यवारांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागातील एम.डी.एस. पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. योगिनी शेंडे, डॉ. यश भिकाणे, डॉ. अक्षय मुचाटे, डॉ. श्रेयस मगर, डॉ. समर्थ रेवडकरी, डॉ. प्रशांत घोगरे, डॉ. वेदिका देशमुख यांच्यासह देशभरातील अनेक प्रख्यात

प्रोस्थोडोंटिस्ट यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या यशाबद्दल सर्व विजेत्या संशोधकांचे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी, प्रोस्थोडोंटिक्स विभाग प्रमुख डॉ. सुशैन गाजरे, डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील, डॉ. शितल वाघ, डॉ. विद्या वायबसे, डॉ. योगेश नागरगोजे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून कौतुक होत आहे.

## करार रखडला: एसटी प्रवाशांचा खोळंबा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ११ मे : डिझेल कंपनी आणि एसटी महामंडळ यांच्यातील करार रखडल्याचा फटका आता थेट प्रवाशांना बसू लागला आहे. जिल्ह्यातील बीपीसीएलच्या पंपावरून एसटी बसेसना डिझेल पुरवठा बंद करण्यात आल्याने अहमदपूर, निलंगा आणि औसा आगारातील बसेसना लातूरपर्यंत धाव घ्यावी लागत आहे. गेल्या महिनाभरापासून ही परिस्थिती कायम असून अद्यापही कोणताही तोडगा निघालेला नाही. परिणामी वेळ, इंधन आणि मनुष्यबळाचा अपव्यय होत असून प्रवाशांना मात्र नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

एसटीच्या दैनंदिन फेऱ्यांवर या प्रकाराचा मोठा परिणाम दिसून येत आहे. नियोजित वेळेत गाड्या डेपोमध्ये उपलब्ध राहत नसल्याने अनेक मार्गावरील बसेस उशिराने धावत आहेत. काही ठिकाणी फेऱ्या रद्द करण्याची वेळही प्रशास-नावर आली आहे. ग्रामीण भागा-तील प्रवाशांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. विशेष म्हणजे, डिझेल भरण्यासाठी बसेसना लातूरला आणावे लागत असल्याने चालक-वाहकांनाही अतिरिक्त ताण सहन करावा लागत आहे. एका बसला डिझेलसाठी अतिरिक्त फेरी मारावी लागत



औशातून लातूरला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अमाप असून यात नोकरी करणारे, विद्यार्थी, व्यापारी, महिलावर्ग आाणि इतर प्रवाशी यांचा समावेश आहे.

सकाळच्या घाईच्या वेळी बस फक्त शिवाजी चौकापर्यंत येत असल्यामुळे प्रवाशांना अतिरिक्त दंड होत आहे, मुळात एस.टी प्रशासनाने तिकीटामध्ये सहा सपयांची वाढ केल्यामुळे प्रवाशी अगोदरच परेशान असून आता दररोज शिवाजी चौक ते गोलाई जाणाऱ्या प्रवाशांवर अतिरिक्त भार पडत आहे.

नाही त्यावेळी कितीतरी बस थांबलेल्या असतात आणि कधीकधी एकही बस बसस्थानकात नसते, अशावेळी एकतर नवीन बसस्थानकात जावे लागते किंवा लातूरमोड वर त्यामुळे हा अतिरिक भार ही प्रवाशांना विनाकारण सहन करावा लागत असल्याने प्रवाशी वर्गातून नाराजीचा सूर निघत आहे.

यावर प्रशासनाने योग्य त्या उपाय योजना करून प्रवाशांचा प्रवास सुखकर कसा होईल याकडे लक्ष द्यावे.

### बस रांगेत, प्रवासी वाटेत

अहमदपूर, निलंगा आणि औसा आगाराच्या बसेसला डिझेलसाठी लातूरकडे वाट वाकडी करावी लागत आहे. इतर तीन डेपो आणि लातूर डेपोतील बसेस यामुळे शहरातील छत्रपती शिव-ाजी महाराज चौकातील डेपोत बसेस रांगेत लावल्या जातात तर असह्य उकाड्याने प्रवाशांना खाली उतरवले जाते. ऐन रस्त्यावरच उभे राहत प्रवाशांना बसची वाट पाह-ावी लागत आहे.

असल्याने आर्थिक नुकसानही वाढत आहे. दुसरीकडे, डेपोमध्ये बसेस वेळेत उपलब्ध नसल्याने स्थानकाबाहेर प्रवाशांच्या रांगा वाढत आहेत. उन्हाच्या तीव्रतेत प्रवाशांची होणारी गैरसोय संतापजनक असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. दरम्यान, संबंधित कराराचा प्रश्र्न तातडीने सोडवून डिझेल पुरवठा पूर्ववत करावा, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा प्रव-ासी संघटनांनी दिला आहे. एसटी प्रशासन आणि संबंधित डिझेल कंपनीने एकमेकांकडे बोट दाखवण्याऐवजी प्रवाशांच्या सुविधेला प्राधान्य द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

संपादकीय

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# परिवर्तनाच्या नव्या दिशा

सामाजिक आणि राजकीय परिवर्तन घडून येण्यासाठी मोठा कालावधी लागत असतो. कारण, या बदलाच्या काळात घट्ट झालेल्या घडीचा प्रत्येक पदर हा नव्याने आकार घेत असतो. स्वातंत्र्यानंतर १९७४ पर्यंत देशात काँग्रेसचा एकछत्री अंमल होता. पंडित जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री आणि इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वातील राजकीय सत्तेची घडी घट्ट झाली होती. स्वातंत्र्याची नवीन पहाट उगवलेल्या विशाल भारतासाठी पर्यायाने जनतेसाठी हा प्रारंभीचा सामाजिक आणि राजकीय कालखंड होता. त्यामुळेच तत्कालीन नेत्यांनी घेतलेले कोणतेही निर्णय, मग ते सामाजिक प्रवाहाच्या विरोधात असले तरी, जनतेने स्वीकारले. पर्याय नव्हतेच. वास्तविक पाहता हे वरवरचे बदल होते. देशात १६ ऑगस्ट १९४६ रोजी मोहम्मद अली जिना यांनी दिलेल्या 'थेट कृती' (डायरेक्ट ॲक्शन) चा नारा आणि त्यानंतर कोलकात्यासह देशातील मुस्लिमबहुल भागात धर्माच्या नावावर हिंदूंची अमानुषपणे केलेली कत्तल देश विसरलेला नाही आणि त्याच्या काळ्या नोंदी कायमच्या स्मृतिपटलावर कोरलेल्या आहेत. 'भारताचे विभाजन करा अथवा भारताला नष्ट करा', असा आदेशच जिना यांनी मुस्लिमांना दिला होता. शेकडो वर्षांपासून बेसावध, नि:शस्त्र आणि निस्तेज बनून राहिलेल्या हिंदूंवर क्रूर दंगलीचे संकट कोसळले. सर्वांत जास्त फटका बंगालमधील हिंदूंना बसला होता. कोलकाताच्या गल्लोगल्ली हिंदूंची प्रेते कित्येक दिवस तशीच पडून होती. त्या प्रेतांवर गिधाडे ताव मारत होती. ही गिधाडे पुढील कित्येक दशके बंगालच्या आकाशात घिरट्या घालत होती. कारण, या गिधाडांना खाद्य पुरविणारी सरकारे येत राहिली. अगदी ४ मे २०२६ पर्यंत ही गिधाडे आकाशात मुक्तपणे संचार करीत होती. पण, अन्यायाने, अत्याचाराने आतून पेटून उठलेल्या बंगाली नागरिकांनी अखेर हिंदुद्रोही मिर जाफरच्या वंशजांना सत्तेवरून खाली खेचले. परिवर्तनाची ही नवी दिशा आहे. खरे तर, थोडाथोडका नव्हे तर सुमारे ८०० वर्षांपासून बंगालच्या नशिबी कधीच शांतता आणि समृद्धीचा काळ आला नाही. तत्पूर्वीचा मौर्य, गुप्त, गौड, पाल, चंद्र, देव आणि सेन राजवंशांचा समृद्ध आणि गौरवशाली काळही बंगालने अनुभवला. मात्र, सेन राजवंशाचा (१२३०) शेवट झाल्यानंतर क्रूर मुस्लिम शासक सुल्तान, मोगल यांनी अत्याचाराच्या सीमा पार करीत बंगालमधील सामाजिक, धार्मिक संतुलनच पार बिघडवून टाकले. बंगालचा गौरवशाली इतिहास नष्ट करण्याबरोबच बंगाली अस्मिता मिटविण्याचे प्रयत्न केले. शतकानुशतके चालत आलेल्या अन्याय, अत्याचारामुळे बंगाली माणूस हतबल झाला होता. उरलीसुरली कसर इंग्रजांनी काढून टाकली. दक्षिणेतील सागरी किनाऱ्यावर मराठ्यांची सत्ता असल्याने तिकडे बस्तान बसविणे कठीण असल्याची जाणीव झाल्यानंतर इंग्रजांनी पूर्व किनाऱ्यावर ताबा मिळविला. कोलकाता हे इंग्रजांचे मोठे लष्करी ठाणे झाले. प्लासी आणि बक्सारच्या लढाया जिंकत इंग्रजांनी भारतात आपले पाय पक्के रोवले. पुढे १८५७ च्या बंडाच्या वेळी कोलकाता येथूनच सैन्याच्या तुकड्या इंग्रजांनी पाठविल्या होत्या. लॉर्ड कर्झनने बंगालचे दोन तुकडे केले होते. विरोधानंतर त्याला निर्णय मागे घ्यावा लागला तरी १९४७ मध्ये धर्माच्या नावावर बंगालचे विभाजन अखेर झालेच. स्वातंत्र्यानंतरही बहुसंख्य हिंदू जनतेला मनमोकळेपणाने जगता आले नाही. फाळणीनंतरच्या हिंसाचारानंतर कोलकातासह राज्यातील मोठ्या शहरातील मुस्लिम पूर्व बंगालमध्ये जाण्याऐवजी खेड्यापाड्यांमध्ये घुसले. त्याकाळी ग्रामीण भागात मुबलक प्रमाणात जमीन रिकामी होती. पुढील तीन दशके या मुस्लिमांना काँग्रेसने पोसले आणि स्थिरस्थावर केले. त्यानंतर १९७७ मध्ये आलेल्या डाव्या सरकारांनी भूमी सुधारणा कायद्याच्या नावाखाली हिंदूंच्या जमिनी काढून घेत मुस्लिमांना वाटल्या. पुन्हा एकदा हिंदूंचे जगणे कठीण झाले. १९७१ मध्ये बांगलादेश स्वतंत्र झाल्यानंतर बंगाली मुस्लिमांचे लोंढेच्या लोंढे पश्चिम बंगालमध्ये घुसले. या घुसखोरांना बाहेर काढण्याऐवजी त्यांना पोसण्याचे काम, काँग्रेस, डावे आणि तृणमूल सरकारने केले. आज बंगालमध्ये मुस्लिमांची संख्या ३० टक्क्यांच्या आसपास आहे. याच लोकसंख्येच्या बळावर आतापर्यंत हिंदुविरोधी राजकीय पक्ष सत्ता उपभोगत आले. पण, हिंदू एक झाला तर कुणाचे काहीच चालत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

४ मे रोजी बंगाली हिंदूंनी तृणमूल काँग्रेसला पार जमिनीवर आदळले. नागरिकांनी मोकळा श्वास घेतला. डावे आणि तृणमूलच्या काळात बंद करण्यात आलेली देवालये खुली झाली; नागरिक आनंदाने जय श्रीराम, मां दुर्गा, मां कालीच्या घोषणा देत आनंदाने नाचू लागली. ही सर्व दृश्ये अंगावर रोमांच उभी करणारी होती. पूर्व भारताचे महाद्वार असलेले पश्चिम बंगाल भाजपासाठी खुले झाले. आता वेळ आहे ती दक्षिणेची. तेथेही वेगळ्या अर्थाने परिवर्तन येतेय. कर्नाटक वगळता भाजपाला कुठेही स्वबळावर सत्ता स्थापन करता आलेली नाही. केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा ही राज्ये अजूनही भाजपासाठी दूर आहेत. पण, आधी उल्लेख केल्याप्रमाणे परिवर्तन होण्यासाठी दीर्घ कालावधी लागत असतो. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भाजपाला जवळपास ५० वर्षे प्रतीक्षा करावी लागली. दक्षिणेत तर आता कुठे जमीन तयार होत आहे. सुदैव असे की अजून तरी दक्षिणेतील राज्ये हिंदुबहुल आहेत. केरळमध्ये तीन तर तामिळनाडूत भाजपाचा एक आमदार निवडून आलेला आहे. केरळमध्ये भाजपाला ११.४२ टक्के मतदान झाले. तामिळनाडूत मात्र, फक्त २.९७ टक्के मते मिळाली; जी डाव्या पक्षांपेक्षा जास्त आहेत, तर काँग्रेसपेक्षा थोडी कमी. पण, आतापर्यंत जे द्रमुक आणि अद्रमुक पक्ष द्रविडी अस्मितेचा आधार घेत सत्तेवर येत होते, त्या अस्मितेलाच यावेळी हिंदू-ख्रिश्चन असलेल्या जोसेफ विजय यांनी सुरुंग लावला. याचाच अर्थ दक्षिणेतील द्रविडी राजकारणाचे प्राबल्य हळूहळू लयाला जात असल्याची ही चिन्हे आहेत आणि ते देखील परिवर्तनच. एका चित्रपट कलाकाराने अगदी दोन वर्षांपूर्वी स्थापन केलेला टीव्हीके हा पक्ष थेट सत्तेत येतो म्हणजे तामिळनाडूतील जनता पारंपरिक द्रविडी राजकारणाला कंटाळली असल्याचे द्योतक आहे. या निवडणुकीत जनतेने थेट वर्मावरच घाव घातला. पश्चिम बंगालमध्ये विद्यमान मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना नंदीग्राम आणि भवानीपूर या दोन्ही मतदारसंघांमध्ये तर तामिळनाडूत एम. के. स्टॅलिन यांना कोलाथूर मतदारसंघात मतदारांनी धूळ चारली. २०११ च्या जनगणनेनुसार तामिळनाडूत ८७.५८ हिंदू आहेत. सनातन संस्कृतीचा वारसा सांगणारी हजारो मंदिरे आहेत. पण, येथे कधीही हिंदुत्ववादी राजकीय पक्षाचे सरकार आले नाही. येथील राजकारण द्रविडी विचारसरणीवर चालणारे आहे. नास्तिकवाद हा द्रविड विचारसरणीचा गाभा आहे. ई. व्ही. रामासामी पेरियार हे पक्के नास्तिकवादी होते. नास्तिक असणे किंवा नसणे हा ज्याचा त्याचा प्रश्न. पण त्यांचा नास्तिकवाद हा तामिळनाडूतील ब्राह्मणांना विरोध करण्याभोवती फिरत होता. त्यांचा देवाला टोकाचा विरोध होता; त्यांच्या नावातही राम हा शब्द आहे हा भाग वेगळा. तामिळनाडूतील राजकारण हे अनेक दशकांपासून द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोनच पक्षांभोवती फिरत राहिले. या दोन्ही पक्षांनी काँग्रेस, भाजपासह एकाही राष्ट्रीय पक्षाला राज्यात फिरकू दिले नाही. असा स्वभाव असलेल्या तामिळनाडूच्या द्विध्रुवीय राजकारणात जोसेफ विजय यांनी मारलेली मुसंडी म्हणजे टीव्हीकेच्या रूपाने राज्याच्या राजकारणात निर्माण झालेला पर्याय मानला पाहिजे. खरे, तर पुढाऱ्यांचे तेच ते चेहरे पाहून जनताही कंटाळली होती. विजय यांनी पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश मिळवून सूड आणि कुरघोडीच्या राजकारणाला मूठमाती दिली आहे. विजय यांचा पक्ष अण्णाद्रमुकच्या मतपेढीला खिंडार पाडेल आणि द्रमुक आपसूकच निवडून येईल, असे अंदाज पोल पंडितांनी बांधले होते. निकालापूर्वी जे अंदाज वर्तविण्यात आले होते, त्यात विजय यांचे नाव कुठेही नव्हते. पण, झाले उलटेच. विजय यांनी द्रमुकच्या मतपेढीलाच खिंडार पाडले. तामिळनाडूच्या भोवती असलेला द्रविडी राजकारणाचा फास सैल होतो आहे. येणाऱ्या काळात भाजपासाठी हे सुचिन्ह आहे, असे म्हणायला हरकत नाही. जे परिवर्तन अधिक काळ घेते, ते तितकेच मजबूत असते हेही वास्तव आहेच. ते सुरू होणे महत्त्वाचे असते आणि जे सुरू होते ते आपल्या दिशेने पुढे जातेच.

## दिल्ली दिनांक

### रवींद्र दाणी

# उच्चांक आणि नीचांक!

उच्चांक आणि नीचांक! एकाचवेळी या दोन्ही बाबी साध्य करण्याची 'जादू' राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी करून दाखविली आहे. ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी केल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीने 'उच्चांक' गाठला आहे आणि दुसरीकडे अमेरिकेत ट्रम्प यांच्या लोकप्रियतेने 'नीचांक' गाठला आहे. २०२५ च्या जानेवारीत ट्रम्प यांनी राष्ट्रपतिपदाची शपथ घेतली तेव्हा ४७ टक्के अमेरिकन जनतेचा त्यांना पाठिंबा होता आणि त्यांनी इराणविरुद्ध युद्ध सुरू केल्यानंतर त्यांची ही लोकप्रियता वाढण्याऐवजी कमी होत, ती आता केवळ ३४ टक्क्यांवर आली आहे. आर्थिक विषय व महागाई हाताळण्याबाबत तर फक्त २२ टक्के अमेरिकन जनता त्यांच्या भूमिकेशी सहमत असल्याचे ताज्या चाचणीत सांगण्यात आले आहे.

**रशिया सुखावला :** अमेरिका-इस्रायल युद्धाने सारे जग चिंताग्रस्त असताना, रशिया मात्र सुखावला आहे. युद्ध सुरू होण्यापूर्वी रशियाची आर्थिक स्थिती चिंताग्रस्त अशी झाली होती. केवळ चार दिवसांत युक्रेनला चित करून हा देश ताब्यात घेऊ असे स्वप्न पाहणाऱ्या राष्ट्रपती पुतिन यांना युक्रेनने त्रस्त केले आहे. चार वर्षे दोन महिने म्हणजे एकूण ५० महिन्यांपासून सुरू असलेल्या या युद्धाने रशियाची अर्थव्यवस्था जर्जर करून टाकली आहे. आता समोर आलेल्या नव्या माहितीनुसार मार्च महिन्यात रशियन सैन्याला युक्रेनचा एक चौरस किलोमीटर भागही ताब्यात घेता आलेला नाही.

**दरमहा ५० हजार :** दुसरीकडे युक्रेनचे राष्ट्रपती झेलेन्स्की यांनी दरमहा ५० हजार रशियन सैन्य ठार करण्याचे लक्ष्य आपल्या सेनाधिकाऱ्यांना दिले आहे. रशियाने वर्षभरात ४ लाख नवे सैन्य भरती करण्याचे ठरविले आहे. त्याला उत्तर देण्यासाठी झेलेन्स्की यांनी दरमहा ५० हजार रशियन सैनिकांना ठार करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. रशिया दरमहा ३५ ते ४० हजार सैनिक गमावीत असल्याचा एक अंदाज वर्तविला जात आहे. यात ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. रशियाचे ९६ टक्के सैनिक युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यात मारले जात आहेत तर फक्त ४ टक्के सैनिक तोफा-बंदुका या परंपरागत शस्त्रांनी मारले जात आहेत.

**प्रचंड नुकसान :** युक्रेन युद्धात केवळ रशियन पायदळाचेच नाही तर रशियाचे नौदल व हवाई दळ यांचेही प्रचंड नुकसान झाले असल्याचे समजते. रशियाला हे सारे अनपेक्षित होते. याचा स्वाभाविक परिणाम रशियाच्या अर्थव्यवस्थेवर दिसून येत आहे. पहिली तीन वर्षे रशियाची जनता शांत होती. आता जनतेतूनही युद्धाच्या विरोधात स्वर उमटत आहेत.

**जनमत चाचणी :** रशियात लोकशाही नावाला असली तेथे सरकारच्या मालकीची एक जनमत चाचणी संस्था आहे. रशियन पब्लिक ओपिनियन रिसर्च सेंटर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या संस्थेने जारी केलेल्या नव्या आकडेवारीनुसार राष्ट्रपती पुतिन यांची लोकप्रियता ८८ टक्क्यांवरून घसरत ६५.६ टक्क्यांवर आली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे युद्धामुळे रशियात वाढलेली महागाई. 'रोसस्टॅट' रशियन फेडरेशन स्टॅटिस्टिक्स सर्व्हिसच्या आकडेवारीनुसार देशातील महागाई ७५ टक्के वाढली आहे. महागाईमुळे चलनवाढ वाढली आहे. यावर उपाययोजना म्हणून रशियाच्या रिझर्व्ह बँकने व्याजाचे दर २० टक्क्यापर्यंत वाढविले होते. आता ते कमी करण्यात आले असले तरी हे दर सध्या १४.५ एवढे वाढलेले आहेत.

**तेल उत्पादनात घट :** रशिया दररोज ४ लाख बॅरल कच्च्या तेलाचे उत्पादन करीत होता. पण, युक्रेनने रशियाची बंदरे व तेल शुद्धीकरण कारखाने यांना लक्ष्य करणे सुरू केल्यापासून, त्याने आपल्या तेल उत्पादनात घट केली असून, रशिया आता दररोज ३ लाख बॅरल तेलाचे उत्पादन करीत आहे. म्हणजे एकीकडे युद्धक्षेत्रात रशियाला फार मोठी सैनिक हानी सहन करावी लागत आहे, दुसरीकडे युद्धामुळे अर्थव्यवस्था डबघाईस आलेली आणि तेल उत्पादनात घट झालेली अशा गंभीर संकटात रशिया सापडला असताना, अमेरिका- इराण युद्ध भडकले आणि रशियाचे फावले.

**तेलाचा ओघ सुरू :** होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्यापासून साऱ्या जगात कच्च्या तेलाचा पुरवठा प्रभावित झाला. सर्वत्र तेलाचे भाव वाढले आहेत आणि याचा नेमका फायदा रशियाने उठविला. अचानक रशियाच्या तेलास मागणी वाढली. ती पूर्ण करणे रशियास जड जात आहे. रशियाने आपल्या कच्च्या तेलाच्या किमती भरमसाट वाढविल्या आहेत. भारतास तो कमी दरात तेल पुरवीत होता. मात्र, मधल्या काळात भारताने रशियाकडून तेलाची आयात कमी केली असल्याने, रशिया नाराज झाला होता. आता रशियाने पूर्वीच्या स्वस्त दरात भारताला तेल देण्यास नकार दिला असल्याचे म्हटले जाते. सध्याच्या जागतिक स्थितीचा पुरेपूर फायदा उठविण्याचा निर्णय रशियाने घेतला असल्याचे दिसते. हे युद्ध त्याच्यासाठी जणू एक पर्वणी ठरले आहे. रशियाच्या अर्थव्यवस्थेला याने एकप्रकारे संजीवनी मिळाली असल्याचे मानले जाते. विशेष म्हणजे अमेरिकेने रशियाकडून आयात केल्या जाणाऱ्या तेलाबाबत जे आर्थिक निर्बंध घातले होते, ते शिथिल केले आहेत. म्हणजे इराण युद्ध झाले नसते तर रशियाचीच आर्थिक कोंडी झाली असती. इराण युद्ध सुरू करून राष्ट्रपती ट्रम्प यांनी एकप्रकारे रशियाला मोठी मदतच केली आहे.

**दुसरी चूक :** अमेरिका-इस्रायल यांनी इराणविरोधात युद्ध सुरू करून पहिली चूक केली होती. आता होर्मुझची नाकेबंदी करुन ट्रम्प दुसरी चुक करीत आहेत. या नाकेबंदीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती एका बॅरलमागे १२३ डॉलरपर्यंत पोहोचल्या आहेत, जो मागील चार वर्षांतील उच्चांक आहे. या नाकेबंदीचा इराणवर परिणाम होत असला तरी इराण काही गुदमरून मरणार नाही. कारण, चीन व पाकिस्तान यांनी इराणची भरपूर मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. इराण-चीन हा रेल्वे मार्ग अस्तित्वात आहेच. या मार्गाने चीन इराणला जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करू शकतो. त्यामुळे या नाकेबंदीने इराणमध्ये हाहाकार होईल व तो नाक मुठीत धरून शरण येईल अशा भ्रमात ट्रम्प यांनी राहू नये.

**पाकिस्तानचा निर्णय :** पाकिस्तानने इराणलगतची आपली सीमा खुली केली असून, या सीमामार्गाने माल वाहतूक सुरू झाली आहे. दोन्ही देशांत २००८ मध्ये झालेल्या एका करारानुसार हे करण्यात आले आहे. गब्ध व ताफतान या दोन मार्गांनी इराणमध्ये सामान पाठविणे सुरू झाले आहे. कराची, कासिम व ग्वादर या बंदरांवर मागील दोन महिन्यांपासून सामानांनी भरलेले ३ हजार कंटेनर पडून होते. ते या दोन मार्गांनी इराणमध्ये पाठविले जात आहेत. पाकिस्तान आणि इराण यांचे फार जवळचे संबंध राहिलेले आहेत. १९४७ मध्ये पाकिस्तान अस्तित्वात आल्यानंतर त्याला मान्यता देणारा इराण हा जगातील पहिला देश होता. ट्रम्प यांना याची कल्पना असणे शक्यच नाही. ट्रम्प यांनी होर्मुझ बंद केल्याने इराणची थोडीफार कोंडी होत आहे हे खरे असले तरी यामुळे इराणपेक्षा जगातील अनेक देश जादा अडचणीत येत आहेत. पण ट्रम्प यांना याची फारशी काळजी नसावी असे दिसते. कारण सध्या तरी ते होर्मुझची नाकेबंदी उठविण्याच्या मन:स्थितीत असल्याचे दिसत नाहीत.

**नवा नीचांक? :** राष्ट्रपती ट्रम्प पुन्हा युद्ध सुरू करण्याचा विचार करीत असल्याचे दिसते. जे युद्धाने साध्य झाले नाही ते नाकेबंदीने कसे साध्य होणार होते? आणि जे नाकेबंदीने साध्य झाले नाही, ते पुन्हा एकदा युद्ध सुरू करून कसे साध्य होणार? हे प्रश्न महत्त्वाचे असले तरी त्याचा विचार करण्याची गरज ट्रम्प यांना वाटत नाही. कारण, युद्धासारख्या गंभीर विषयाबाबत सखोल विचार करण्याची मानसिक क्षमता त्यांनी केव्हाच गमावली आहे. बहुधा यामुळेच त्यांना पदावरून हटविण्यासाठी २५ व्या घटनादुरुस्तीचा वापर करण्याची मागणी अमेरिकेत जोर धरू लागली आहे. तसे झाल्यास तो एक नवा नीचांक असेल. कारण, मानसिक असंतुलनासाठी आजवर कोणत्याही अमेरिकन राष्ट्रपतीस हटविण्यात आलेले नाही.

## वेध

### अनिल उमाकांत फेकरीकर

# शेतातील कचरा पेटविणे थांबवा!

शेतात कचरा दिसताच सरसकट आग लावली जाते. हीच आग मग पिकांसाठी आणि आसपास राहणाऱ्या लोकांकरिता कर्दनकाळ ठरते. आग लावल्याने लाभदायक सूक्ष्मजीव तडफडून मरतात. त्याचा फटका पिकांना बसतो अन् उत्पादनात घट होते. खतांचा खर्च वाढून शेती तोट्यात येते. एवढे शास्त्रीय संशोधन माहीत असतानाही महाराष्ट्रासह देशभरात बहुतांश शेतकरी हंगाम संपल्यावर शेतातील कचरा जाळण्यातच धन्यता मानतात. खरीप आणि रबी हंगाम संपल्यावर सर्व शेतकरी थोडा आराम करतात. त्यानंतर पुन्हा खरीप हंगामाच्या तयारीला लागतात. त्यांची तयारी एप्रिल, मे महिन्यात धुरा पेटविण्यापासून सुरू होते. पण धुरा पेटविल्याने जमिनीतील सूक्ष्म जीवजंतू मरतात. परिणामी शेतातील सुपिकता घटते. शेती तोट्यात येण्याचे हेही एक प्रमुख कारण आहे. म्हणूनच आता सरकारने शेतातील कचरा जाळण्यावर बंदी आणलीच पाहिजे. पंजाबमध्ये, तेथील शेतकरी धानाची कापणी झाल्यावर परळी जाळायचे. त्यामुळे होणारा धूर राजधानी दिल्लीत राहणाऱ्यांना जीवघेणा ठरायचा. एक तर मरा किंवा परळी जाळण्यावर सरसकट बंदी टाका असे दोनच पर्याय दिल्ली वाचविण्यासाठी समोर होते. संसदेतील खासदारांसह सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांपासून ते सामान्य माणसालाही त्याची झळ बसल्याने त्यांनी परळी जाळण्यावरच बंदी आणली. याचा अर्थ प्रशासकीय व्यवस्थेतील लोकांना जेव्हा त्रास होईल तेव्हाच त्यांनी चांगले निर्णय घ्यायचे काय, यावरही मंथन व्हायला हवे. घटना घडल्यावर हातपाय हलविण्यापेक्षा ती घडू नये, याचीच व्यवस्था अमलात आणणे काळाची गरज आहे.



नागपूर जिल्ह्यात येणाऱ्या भिवापूर तालुक्यातील धामणगावात शनिवार, २ मे २०२६ रोजी कैलास ढाकुणकर याने शेतात कचरा जाळला. त्याच्या निष्काळजीपणामुळे धामणगावातील ४५ घरांची राखरांगोळी झाली. पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पण झालेल्या नुकसानीचे काय? त्याचा विचार करता चूक करणाऱ्याकडूनच संपूर्ण आर्थिक नुकसानभरपाई वसूल करायला हवी. जेव्हा कठोर शिक्षा होईल, तेव्हाच शेतात कचरा जाळण्यापूर्वी शंभर वेळा विचार केला जाईल. तसे पाहता जोपर्यंत पृथ्वीवर माणूस राहील, तोवर शेतीचा व्यवसाय कायम राहणार आहे. शेतीशिवाय माणसाला दुसरा पर्याय नाही. हीच शेती समृद्ध करण्याचे कार्य डोळ्यांनी न दिसणारे सूक्ष्मजीव करीत असतात. याचा अर्थ ते आपले मित्रच म्हणायला हवेत. जेव्हा धुरा किंवा शेतातील कचरा पेटवला जातो तेव्हा हे सर्व सूक्ष्मजीव अक्षरश: तडफडून मरतात. यात प्रामुख्याने रायझोबियम, ॲझोस्पिरिलम, ॲझोटोबॅक्टर, निळे, हिरवे शेवाळ, ॲझोला यांचा समावेश आहे. रायझोबियम आणि ब्रॅडीरायझोबियम, जे नायट्रोजन खतांची गरज कमी करतात, मातीचे आरोग्य सुदृढ करतात. बॅसिलस सेरेयस जे वनस्पतींवरील मिठाचा ताण कमी करतात. वनस्पतींच्या वाढीस प्रोत्साहन देणारे रायझोबॅक्टेरिया बॅसिलस सबटिलिस, कृत्रिम कीटकनाशकांची गरज कमी करतात. नैसर्गिक रोग प्रतिकारशक्ती वाढवतात. पण शेतातील कचरा पेटवल्याने सूक्ष्म जिवांची हत्या होते. यासंदर्भात कुठल्याही पोलिस स्टेशनला खुनाचा गुन्हा दाखल होत नाही. मात्र निसर्ग नियमानुसार शेत उत्पादनात घट वाढते अन् तोटा होतो. निसर्ग न्यायालयाची आपली एक पद्धत आहे. त्याचे स्वत:चे चक्र आहे. मग नैसर्गिक चक्रात कचरा जाळून अडथळा आणण्याचा अधिकार शेतकऱ्यांना कुणी दिला आहे का? वस्तुत: त्यांनी शेतातील कचऱ्यापासून खतनिर्मिती करून सदुपयोग करावा. पण हा द्रविडीप्राणायाम करायचा कुणी, हळूहळू आता शेतकरीही विविध कारणांनी त्रस्त असल्याने जास्त भानगडीत पडतच नाहीत. त्यांनाही वाटते, मला काय करायचे? शेवटी शेती समृद्ध करायची असेल तर सूक्ष्म जिवांना वाचवा अन् शेती फुलवा हा मंत्र प्रत्यक्षात आणावा लागेल.

शेतातील कचऱ्याला आग लावली तर नवीन पीक आणि गवत चांगले उगवेल, अशी शेतकऱ्यांची धारणा आहे. पण ते पूर्णत: चूक असल्याची माहिती चंदनश्री पुरस्कार विजेते कृषितज्ज्ञ दिनेश ठाकरे यांनी दिली. नत्र, स्फुरद, पालाश, लोह, बोरॉन, जस्त, मंगल, मॉलिब्डेनम, तांबे, गंधक यांना अन्नद्रव्ये म्हणतात. यांचा अभाव असल्यास झाडांची पाने पिवळी पडतात. वाढ खुंटून जाते. पिकांवर प्रतिकूल परिणाम होतो. आग लागल्याने विविध अन्नद्रव्यांचा नाश होतो. एवढी मोठी हानी पाहता आग लावायचीच कशाला? शेवटी आग लावणाऱ्यांपेक्षा समाजातील सुज्ञ लोकांनी विझविणाऱ्यांनाच नेहमी सन्मान दिला आहे, नाही का?

९८८१७१७८५९

## कानोसा

### अमोल पुसदकर

# संथ वाहते कृष्णामाई

नुकतेच नरसोबावाडी येथे दर्शनासाठी जाणे झाले. कृष्णा नदीच्या काठावर नृसिंह सरस्वती यांच्या पादुका आहेत. अत्यंत रमणीय आणि पवित्र असा हा परिसर आहे. संथ वाहणारी कृष्णामाई बघून 'संथ वाहते कृष्णामाई, तीरावरल्या सुखदु:खांची जाणीव तिजला नाही' या गीताच्या ओळी आठवल्या. दर्शन घेण्याच्या आधी कृष्णा नदीवर जाऊन हातपाय धुवावे असा विचार आला आणि पाच-सहा पायऱ्या उतरून पाण्यापर्यंत गेलो; परंतु पाण्याची अवस्था बघितल्यावर खरंच वाईट वाटले, कारण पाणी शुद्ध नव्हते.

आमच्या देशामध्ये नदीला अत्यंत पवित्र मानले जाते. गंगामाता, नर्मदा माता असे म्हणून आम्ही तिचा सन्मान करतो. काही वर्षांपूर्वी बसने प्रवास करीत असताना एका पुलावरून बस जात होती. खाली नदीचे विस्तीर्ण पात्र होते. माझ्या बाजूला एक साधू महाराज बसलेले होते. मी त्यांना सहजच विचारले की, ''महाराज, ही कोणती नदी आहे?'' त्यांनी नदीकडे पाहिले, पण काही उत्तर दिले नाही. मला असे वाटले की त्यांना ऐकू आले नसेल, म्हणून मी पुन्हा विचारले, ''महाराज, ही कोणती नदी आहे?'' काही वेळ थांबून ते मला म्हणाले, ''साहेब, हिला नदी म्हणू नका; ही नर्मदा मैया आहे.'' असे म्हणताना त्यांचे डोळे भरून आलेले होते. भारताच्या जनमानसात भरलेली ही भक्ती पाहून मी रोमांचित झालो. नद्यांच्या किनाऱ्यावर केवळ गावे वसलेली नाहीत, तर इथे संस्कृती वसलेली आहे. नद्यांच्या काठावर आमच्या देशातील लोकांचे जीवन फुलले आहे. पवित्र नद्यांच्या काठीच ऋषी-मुनी, संतांचे आश्रम आहेत, प्रसिद्ध देवालये आहेत. प्रत्येक नदीचे काहीतरी महत्त्व आहे. पर्वणीचा काळ जेव्हा असतो, तेव्हा वेगवेगळ्या नद्यांवर स्नान करण्याची आमची परंपरा आहे. या नदी-स्नानामागे सुद्धा कदाचित आमच्या पूर्वजांचा हेतू असेलच की, ज्या पाण्यामध्ये स्नान करायचे आहे ते पाणी शुद्ध असायला पाहिजे; म्हणून तरी लोक नद्यांचा सन्मान करतील, जलस्रोत शुद्ध ठेवतील. पूर्वी 'गंगे च यमुने चैव' असे म्हणत लोक घरीसुद्धा स्नान करायचे. नद्यांशी आमचा संपूर्ण भारतीय समाज जोडलेला होता. नद्यांमुळे देशाची सांस्कृतिक एकात्मता आणि राष्ट्रीय एकात्मता सुद्धा मजबूत झालेली आपल्याला दिसून येते.

स्वातंत्र्यानंतर देशामध्ये मोठमोठी धरणे उभी राहिली. शेतीला पाणी मिळावे, वीज निर्माण व्हावी असे अनेक हेतू त्यामागे होते ते साध्यही झाले असेल. परंतु त्यामुळे हजारो हेक्टर जमीन पाण्याखाली गेली. कृषियोग्य जमीन गेली, पडीत जमीन गेली, आजूबाजूची जंगले सुद्धा गेली. माणसांचे पुनर्वसन झाले; त्यांना जमिनी मिळाल्या, पैसे मिळाले; परंतु प्राण्यांचे काय, पक्ष्यांचे काय? त्यांचे निवासस्थान असलेली जंगले नष्ट झाली; ती तर पुन्हा कोणी लावली नाहीत. प्राण्यांचे, पक्ष्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट झाले; त्यांच्या आवागमनाचे मार्ग जलमय झाले. एका ठिकाणी मी वाचले होते की, नद्या आटल्यामुळे आजूबाजूचा हिरवागार परिसर हळूहळू नष्ट झाला. त्या परिसरात असणाऱ्या तृणभक्षी प्राण्यांचे अस्तित्वही हळूहळू समाप्त होत गेले. तृणभक्षी प्राणी तिथून निघून गेल्यामुळे मांसभक्षी प्राणी सुद्धा निघून गेले. मांसभक्षी प्राणी आणि तृणभक्षी प्राणी गेल्यामुळे त्यांच्यावर ज्या पक्षांची उपजीविका होती, त्यांनाही तो परिसर सोडावा लागला. पक्षी निघून गेल्यामुळे जंगलाची वाढ थांबली; जंगल दाट राहिले नाही व पुढे समाप्त झाले. सध्या कोणालाच वेळ नाही. माणसांना माणसांसाठी वेळ नाही, तर पशुपक्ष्यांसाठी कसा असेल? जंगले राहिली काय, संपली काय, प्राण्यांचे, पक्ष्यांचे अधिवास नष्ट झाले काय याचा विचार करायला फारसा कुणाला वेळ उरलेला नाही. तरीसुद्धा आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, हे निसर्गाचे सर्व सहकारी आपलेच आहेत. आपल्या अस्तित्वासोबत त्यांचेही अस्तित्व निर्माण झालेले आहे; त्यामुळे यांच्याही जीवनाचा काही ना काही उद्देश आहेच.

आपल्या धर्मग्रंथांमध्ये, जो वाहत्या जलाला प्रदूषित करतो, नदीकाठी मलमूत्र विसर्जन करतो, अशांना पापाचे भागीदार म्हटलेले आहे. जो हिरव्या वृक्षांना तोडतो, त्यालाही पापाचा भागीदार म्हटलेले आहे. आता सर्वत्र ही भागीदारी वाढलेली दिसत आहे. कारखान्यांमधून सोडले जाणारे पाणी नद्यांना प्रदूषित करत आहे. शहरांमध्ये सांडपाण्यामुळे नद्या या नाल्यांमध्ये परिवर्तित झालेल्या आहेत. गावोगावी हीच कथा आहे.

भारतातील पवित्र नद्यांची परिस्थिती जर खराब असेल, तर सर्वसामान्य नद्यांचे हाल कोण बघणार? 'नमामि गंगे' हा गंगा शुद्धीकरणाचा कार्यक्रम काही वर्षांपासून सुरू आहे; परंतु गंगेमध्ये सोडले जाणारे प्रदूषित पाणी, नाले, कारखान्यांचे पाणी यांचा जोपर्यंत बंदोबस्त केला जात नाही, तोपर्यंत गंगा शुद्ध कशी होणार, हाही एक प्रश्न आहे. यमुनोत्रीवरून येणारी यमुना ही सुद्धा शुद्ध असते; परंतु दिल्लीमध्ये प्रवेश केल्यावर मात्र यमुनेची परिस्थिती नाल्यापेक्षाही वाईट होते. काही दिवसांपूर्वी एका गावी जाणे झाले. तिथे गेल्यावर लक्षात आले की, वैनगंगेचे पात्र गावापासून खूपच जवळ आहे. स्वाभाविकच त्या ओढीने जवळपास अर्धा किलोमीटरचे अंतर कापून पाण्यापाशी गेलो आणि चेहऱ्यावर थोडे थंडगार पाणी मारावे म्हणून ओंजळीत घेतले; आणि चेहऱ्यावर पाणी मारणार, तोच त्या पाण्याकडे लक्ष गेले आणि खूपच धक्का बसला. ओंजळीत घेतलेले ते पाणी अत्यंत निराशेने पुन्हा सोडून दिले इतके ते खराब होते.

जंगलातले नाले, नद्या मात्र आपली शुद्धता टिकवून आहेत. काही वर्षांपूर्वी मध्यप्रदेशला जाताना घनदाट जंगल लागले. त्या जंगलातून जाताना एक खळाळत वाहणारा जलप्रवाह दिसला. तिथे आम्ही थांबलो आणि त्या थंडगार व अत्यंत शुद्ध पाण्याने कितीतरी वेळा चेहरा धुतला. एकदम शांतीचा अनुभव होता तो. शहरातल्या गर्दीने, धावपळीने त्रस्त झालेल्या लोकांना अशा पद्धतीचा अनुभव जर शहराच्या काही अंतरावर येऊ शकला, तरीसुद्धा त्यांचा थकवा निवळून जाईल. नद्यांचे हे पावित्र्य, स्वच्छता, शुद्धता, शीतलता टिकवण्याचे कार्य आम्हाला सगळ्यांना मिळूनच करायचे आहे.

ज्ञानेश्वर माउलींनी ज्ञानेश्वरीमध्ये म्हटले आहे ''कां फेडित पाप ताप । पोखीत तीरींचे पादप । समुद्रा जाय आप । गंगेचें जैसें ॥'' समाजाचे पाप आणि ताप यांचे हरण करण्याचे कार्य ज्या पवित्र गंगेला करायचे आहे, तिचे ते जीवितकार्य तिने करावे या साठी सुज्ञ समाजाने विचार आणि कृती करण्याची आवश्यकता आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## कवी आणि कविता : एक विचारमंथन

दि. १० मे च्या अंकातील 'रविवारची पत्रे' अंतर्गत उपरोक्त मथळ्याखालील संजय वसंत पातुरकर यांनी काव्यरचनेबाबत ज्या विश्लेषणात्मक सूचना केल्या आहेत त्या समस्त काव्यछंदी कवी लोकांनी अनुसराव्या असे वाटते. जेणेकरून आधुनिक काळात होऊन गेलेल्या दिग्गज कवींनी जे मराठी साहित्य समृद्ध केले व आपल्या काव्यप्रतिभेने मराठी काव्यविश्व उजळून टाकले त्याचे आपल्या क्षमतेनुसार अनुसरण करून अधिक सक्षम, अर्थपूर्ण आणि प्रभावी काव्यरचना; सामान्य काव्य रसिक वाचकांना समजतील अशा अर्थसुलभ रचना कराव्या. गूढ व गर्भित अर्थांच्या शब्दयोजना असणाऱ्या काव्यरचना सामान्य आकलन क्षमता असणाऱ्या वाचकांना समजत नाहीत. उघड अर्थवाही, सोपी शब्द रचना मानवी स्वभावाच्या, सुखदु:खाच्या भावभावना व अनुभवांचे गुंफण असणाऱ्या काव्यरचनांचाही प्रसिद्धीत समावेश असावा असे विनंतीपूर्वक सुचवावे वाटते.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/७०५८९७५३७६

## इस्रायलला इटलीचा दणका

इटलीच्या तडफदार पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि त्यांचे सरकार सातत्याने युद्धाला विरोध करत आले आहेत. इटलीने अलिकडेच घेतलेल्या एका निर्णयाने संपूर्ण युरोपात खळबळ उडाली आहे. आजपर्यंत इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे जॉर्जिया मेलोनी यांचे सरकार आता मात्र उघडपणे इस्रायलच्या विरोधात निर्णय घेत आहे. इस्रायलच्या युद्धखोरीबद्दल अतिशय परखड भाषेत टीका करणाऱ्या राष्ट्रप्रमुखांमध्ये जॉर्जिया मेलोनी या अग्रस्थानी होत्या. आता त्यांनी इस्रायलबरोबरचा संरक्षण सहकार्य करारदेखील स्थगित करण्याचा धक्कादायक निर्णय घेतला आहे. गाजापट्टीमधील पॅलेस्टिनी जनतेचा प्रदीर्घ संघर्ष, वेस्ट बँकमधील इस्रायली आणि स्थानिक नागरिकांपर्यंत वाढता वाद तसेच लेबनॉनवर सुरू असलेले इस्रायलचे विनाशकारी हल्ले आदी गोष्टींमुळे जॉर्जिया मेलोनी यांनी हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट होत आहे.

अलिकडच्या कारवायांमुळे इस्रायलशी जगभरातील देश संबंध तोडून टाकण्याचे निर्णय घेत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा तणाव निर्माण झालेला असतानाही इस्रायलकडून लष्करी कारवाया सुरूच राहिल्यामुळे तसेच इराण आणि अमेरिका यांच्यातील शांती वार्तेमध्ये खोडा घालत असल्यामुळे बेंजामिन नेत्यानाहू यांच्या विरुद्धचा जागतिक रोष वाढत आहे. गेल्या काही दिवसांअगोदर इस्रायली सैन्याकडून लेबनॉनमधील संयुक्त राष्ट्र शांतता मोहिमेत सहभागी असलेल्या इटालियन जवानांवर गोळीबार करण्यात आला होता. या घटनेत प्राणहानी झाली नसली तरी लष्करी वाहनांचे मोठे नुकसान झाले होते. त्याचा इटलीने तीव्र निषेध नोंदवला तसेच इस्रायली राजदूताला पत्राद्वारे जाबही विचारला होता. त्यानंतर इटलीचे परराष्ट्रमंत्री ताजानी यांनी लेबनॉनची राजधानी असलेल्या बैरुत शहराला भेट देत लेबनॉनला जाहीर पाठिंबा दर्शविला.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## वाचक पत्रे

## महिला व मुलींवरील अत्याचाराची वाढती प्रकरणे

भारत देश हा प्रेम संबंधांवर आधारित देश आहे. सर्व जगामध्ये भारतीय संस्कृती ही उच्च प्रतीची आहे. येथील सभ्यता जगात प्रसिद्ध आहे. भारतात नद्यांना माता म्हटलेले आहे तर दगडालाही भारतीय लोक देव स्वरूप समजतात. येथील लोक नरामध्ये राम व नारीमध्ये सीता पाहतात.



अशा या पवित्र भारताच्या महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षात सुमारे ९४ हजार महिला व मुली बेपत्ता झाल्याची आकडेवारी जाहीर झालेली आहे. यांची कारणे शोधताना संबंधित यंत्रणा आजवर काही मीमांसा करताना दिसत आहेत. या बेपत्ता होणाऱ्यांपैकी काही प्रकरणे प्रेमसंबंधाशी जोडली गेली असतात, तर काही प्रकरणांमध्ये घरगुती वादातून महिला, मुली घराबाहेर पडत असल्याचे दिसून येते. अत्याचार, दडपण अशा कारणांनी घर सोडून निघून जाण्याची मानसिकता एखाद्या क्षणी बळावते असेही या यंत्रणांना वाटत होते. काही महिला बेपत्ता होण्याचा प्रकरणात मानवी तस्करी करणाऱ्या व महिलांना अनैतिक धंद्याच्या जाळ्यात ओढण्याच्या टोळ्यांचा सहभाग असावा असेही निष्कर्ष काढले गेले होते. राज्याच्या विधिमंडळ अधिवेशनात सक्तीच्या धर्मांतराविरोधात विधेयक पारित झाले आहे. याचे कायद्यात रूपांतर होण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अशी किती प्रकरणी पुढे येत राहणार अशी भीती मात्र समाजाला सतावते आहे. महिला व मुलींवरील अत्याचाराची प्रकरणे अलिकडे का वाढली आहेत? अत्याधुनिक होण्याच्या लालसेने आम्ही अमेरिकेतील लोकांच्या फॅशनचे अंधानुकरण करत आहोत का? याचाही विचार होणे आवश्यक वाटतो.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.daniktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सरस्वती नदीपात्रात खोलीकरण करताना सिमेंट कॉँक्रिटीकरण करू नका

**पंकजाताई मुंडे यांची नगराध्यक्षांना सूचना; गाव भागातील अनेक नागरिकांनी प्रत्यक्ष भेटून मांडले होते**

**परळी वैजनाथ |** शहराच्या मध्यभागातून जाणाऱ्या सरस्वती नदीपात्राचे खोलीकरण करताना त्याठिकाणी सिमेंट कॉँक्रिटीकरण करू नये, पर्यावरणा बरोबरच जलस्रोताचा संभाव्य धोका टाळावा अशी सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नगराध्यक्ष व नगरपरिषदेला केली आहे. गाव भागातील अनेक नागरिकांनी यासंदर्भात नुकतीच ना. पंकजाताईंची भेट घेऊन यासंदर्भात आपले गाऱ्हाणे मांडले होते, त्यानंतर याची दखल घेत त्यांनी ही सूचना केली.

अंबेवेस भागातून वाहणाऱ्या सरस्वती नदीपात्राचे सौंदर्यीकरण, स्वच्छता व खोलीकरण करण्यासाठी शासनाने आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत नगरपरिषदेला मोठा निधी उपलब्ध करुन दिला आहे. नदीपात्राची सध्याची अवस्था बघता त्याचे रूप पालटणे आवश्यक होते, तथापि नदीपात्राचे खोलीकरण करत असताना बेसमेंटला सिमेंट कॉँक्रिटीकरण केले जावू नये याची दक्षता पालिका प्रशासनाने घ्यावी. पावसाळ्यात ज्यावेळी ही नदी वाहते, त्यावेळी पाणी जमिनीत मुरते आणि त्याचा परिणाम म्हणजे गाव भागातील आड अथवा बोअरला पाणी कायम राहते, नागरिकांना टंचाईला सामोरे जावे लागत नाही. तथापि नदीपात्रात सिमेंट कॉँक्रिटीकरण केल्यास पाणी झिरपणार नाही आणि गाव भागातील आड, बोअर आटतील परिणामी नागरिकांना मोठी अडचण निर्माण होईल, त्यामुळे हे कॉँक्रिटीकरण करू नये, अशी मागणी अनेक नागरिकांनी ना. पंकजाताईंना प्रत्यक्ष भेटून केली होती,

# गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न



**अंबाजोगाई (प्रतिनिधी) |** येथील गोदावरी बाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयात गट शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने अंबाजोगाई शहरातील शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उत्तुंग यश प्राप्त केलेल्या दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न झाला.

यावेळी व्यासपीठावर

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य अनिल मुरकुटे,रविवार पेठ केंद्राचे केंद्र प्रमुख केंद्रे सर, मंचावर उपस्थित मुख्याध्यापीका सौ.मिना परोपकारी, मुख्याध्यापिका सौ.पाठक,श्री अनंतराम कोपले सर,उमाप सर,ढगे सर,मुंजे सर, अन्सारीसर,तांबडे सह मान्यवर मुख्याध्यापक उपस्थित होते.

प्रास्ताविकात केंद्रे सर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराच्या संदर्भातील भुमिका स्पष्ट केली.

व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कौस्तुभ मातेकर याने आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी बोलताना प्राचार्य अनिल मुरकुटे म्हणाले की, गटशिक्षण अधिकारी कार्यालयाच्या वतीने हा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त केले, गुणवंत, ज्ञानवंत,होणे सोपे नाही, या विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या पालकांचे सुद्धा अभिनंदन केले पाहिजे .अंबाजोगाई हे शहर बुध्दीवंतांचे ज्ञानवंतांचे शहर आहे त्यांना ज्ञान दान करणारे शिक्षक सुद्धा कौतुकासाठी पात्र आहेत.पहील्या ईयत्ते पासून सुरू झालेला प्रवास आनंददायी होता, आता इथून पुढचा प्रवास खडतर आहे, विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेतांना खूप मेहनत घेणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.संयम समयसूचकता व निर्णयावर ठाम राहुन आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्नशील रहा असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात गटशिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.विद्यार्थीना करीअर च्या अनेक संधी उपलब्ध आहेत त्यानुसार मार्गक्रमण करीत रहावे व आपले व आपल्या आई वडीलांचे शाळेचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन केले.

# गर्भवती महिला हेळसांड: गर्भातील बाळाच्या मृत्यू प्रकरणी चौकशी समिती परळीत दाखल



परळी वैजनाथ (प्रतिनिधी): परळी शहरातील गित्ते हॉस्पिटल या खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून, या प्रकरणाच्या चौकशीसाठी जिल्हा शल्य चिकित्सकांनी नियुक्त केलेली चार सदस्यीय समिती परळीत दाखल झाली आहे. समितीने संबंधित गित्ते हॉस्पिटलला भेट देत प्राथमिक माहिती घेतली.

गित्ते हॉस्पिटलच्या डॉ.कल्पना सचिन गित्ते या डॉक्टरांच्या कथित निष्काळजीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला होता. याप्रकरणी संबंधित डॉक्टरांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून, घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती.

घटनेची गंभीर दखल घेत जिल्हा शल्य चिकित्सकांनी चार सदस्यीय वैद्यकीय चौकशी समिती स्थापन केली. ही समिती आता रुग्णालयातील उपचार प्रक्रिया, वैद्यकीय कागदपत्रे, तपासण्या तसेच संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांची माहिती तपासणार आहे. तसेच रुग्णाच्या नातेवाईकांची बाजूही ऐकून घेतली जाणार असल्याची माहिती मिळाली आहे.

समितीकडून संपूर्ण चौकशी पूर्ण झाल्यानंतर अहवाल जिल्हा प्रशासनाकडे सादर केला जाणार आहे. या अहवालानंतर संबंधित डॉक्टरांविरोधात पुढील कारवाई होणार की नाही, हे स्पष्ट होणार असल्याने या प्रकरणाकडे शहराचे लक्ष लागले आहे.

# बीडमध्ये स्व.झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या कीर्तन महोत्सवाची आज भक्तीमय वातावरणात सांगता

## विश्वनाथ महाराज वाडेकर, कबीर महाराज आतार व कान्होपात्राताई शिंदे यांची होणार किर्तनसेवा

**बीड, दि.११ (प्रतिनिधी) |** येथील स्वर्गीय झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या भव्य संत कथा आणि कीर्तन महोत्सवाची आज, मंगळवार (दि.१२ मे) रोजी वारकरी सांप्रदायिक कीर्तनांनी मोठ्या उत्साहात सांगता होणार आहे. गेल्या पंचवीस वर्षांपासून अविरतपणे सामाजिक आणि आध्यात्मिक विचारांची पताका खांद्यावर घेऊन कार्य करणाऱ्या खटोड प्रतिष्ठानच्या वतीने यंदा अधिक मासानिमित्त आयोजित हा भक्ती सोहळा बीडकरांसाठी वैचारिक पर्वणी ठरला आहे.

स्व. झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठानने गेल्या २५ वर्षांची अखंड परंपरा जोपासत यंदाही अधिक मासानिमित्त दि. ५ ते १२ मे या कालावधीत विविध संगीतमय कथा आणि सांप्रदायिक कीर्तनांचे आयोजन केले होते. या महोत्सवामध्ये प्रारंभी साध्वी अनुराधा दीदी पंढरपूरकर यांच्या सुमधूर वाणीतून संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथा भाविकांच्या मनाचा ठाव घेणारी ठरली. त्यानंतर, ह.भ.प. वेदविभूषण उद्धोध महाराज (श्री संत नरहरीनाथ महाराज संस्थान, श्रीक्षेत्र देऊळगावराजा) यांच्या वाणीतून श्री नवनाथ कथासाराचे रसाळ निरूपण करण्यात आले. महोत्सवाच्या उत्तरार्धात दि.९ ते ११ मे दरम्यान अहमदनगर येथील निरुपणकार ह.भ.प. गीतांजलीताई झेंडे यांनी अधिकमास महात्म्य कथेच्या माध्यमातून उपस्थितांना भक्तीरसात मंत्रमुग्ध केले.







आज तीन सत्रांत होणार कीर्तन सेवा

या महोत्सवाच्या सांगता समारंभाप्रसंगी आज दि.१२ मे रोजी नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी १ या पहिल्या सत्रात जळगाव येथील कीर्तनकार विश्वनाथ महाराज वाडेकर यांचे सांप्रदायिक कीर्तन होईल. त्यानंतर दुपारी २ ते ५ या वेळेत पुणे येथील कबीर महाराज आतार आपली सेवा रुजू करणार आहेत. महोत्सवाचा शेवटचा टप्पा सायंकाळी ६ ते ९ या वेळेत हिंगोली येथील कीर्तनकार कान्होपात्राताई शिंदे यांच्या कीर्तनाने संपन्न होईल. या तीनही कीर्तन सोहळ्यांनी या महोत्सवाची मोठ्या भक्तीभावाने सांगता होणार आहे.

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे होणाऱ्या या आध्यात्मिक सोहळ्यासाठी बीड शहर व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिरसाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वर्गीय झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# वारकरी संप्रदायाचे विचार मनुष्य जीवनाला दिशा देणारे ; ह.भ.प. गीतांजलीताई झेंडे

## बीडमध्ये 'अधिकमास महात्म्य' कथेचे दुसरे पुष्प; खटोड प्रतिष्ठानचा उपक्रम




**बीड, दि.११ (प्रतिनिधी) |** प्रापंचिक जीवन जगत असताना येणारी दुःखे विसरण्यासाठी आणि संकटातून मार्ग काढण्यासाठी माणसाने संतांप्रमाणे निस्सीम भक्तिमार्ग अंगीकारला पाहिजे. वारकरी संप्रदायाचे संत विशाल विचार संपूर्ण मानव जातीला दिशा देणारे आणि दुर्जनांना सज्जन बनवणारे आहेत, असे प्रतिपादन अहिल्यानगर येथील निरूपणकार ह.भ.प. गीतांजलीताई झेंडे यांनी केले.

येथील स्वर्गीय झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित 'अधिकमास महात्म्य' कथेच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी ( दि.११) त्या बोलत होत्या. कथेचे दुसरे पुष्प गुंफताना त्यांनी वारकरी संप्रदायाचे वैभव आणि संतांच्या त्यागमय जीवनावर प्रकाश टाकत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. सोमवारी संपन्न झालेल्या या सोहळ्याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खटोड व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते गीतांजलीताई झेंडे यांचा सत्कार करण्यात आला.

कथा निरूपण करताना गीतांजलीताईंनी जात्यावरील ओव्या सादर करत उपस्थितांची मने जिंकली. मानवी जीवनातील संघर्षावर भाष्य करताना त्या म्हणाल्या, संकटे ही माणसाला अनुभव देण्यासाठी,शिकवण्यासाठी येतात आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी परमात्मा सदैव मदत करतो, याची प्रचिती संतांच्या चरित्रातून येते. परमात्मा भक्ताचे कूळ न पाहता केवळ त्याचा भाव पाहतो, हाच समतेचा विचार संतांनी विश्वाला दिला आहे.

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या 'सकळांशी येथे आहे अधिकार, कलियुगे उद्धार हरीच्या नामे' या अभंगाचे प्रमाण देत गीतांजलीताई झेंडे म्हणाल्या, कलियुगात नामाचा महिमा अगाध आहे. ज्याला कोणी स्वीकारत नाही, त्याला संतांनी मायेने जवळ केले. संतांच्या वाट्याला आयुष्यात अनेक दुःखद प्रसंग आले, त्यांचा भूतकाळ संघर्षाचा होता; मात्र त्याग आणि क्षमा या गुणांमुळेच आज सर्वत्र जयजयकार होतो. संतांचे विचार प्रमाण मानून माणसाने आपली वाटचाल करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या प्रसंगी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय संस्कृतीत प्रत्येक तीन वर्षांनी येणाऱ्या अधिकमासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा वारसा तरुण पिढीपर्यंत पोहोचावा या उद्देशाने या कथेचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिष्ठानच्या वतीने सांगण्यात आले.

# डॉ. झाकीर हुसेन उर्दू शाळा परळी वै. दहावीच्या परीक्षेस घवघवीत यश उर्दू माध्यमातून तालुक्यात प्रथम.96.96%



**डॉ. झाकीर हुसेन उर्दू शाळेची विद्यार्थिनी नगमा मुख्तार खान महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहाय्यक पदी निवड झाली.**

परळी वैजनाथ - परळी वैजनाथ येथील डॉ. झाकीर हुसेन एज्युकेशन सोसायटी, जिल्हा बीड संचलित डॉ. झाकीर हुसेन उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च 2026 मध्ये 96.96 टक्के निकालासह परळी तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. उर्दू माध्यमातून विद्यालयाने हे यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. तसेच बारावी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी 2026 मध्ये विज्ञान शाखेचा 98 टक्के निकाल लागला असून, विद्यालयाने यशाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली आहे. दहावीच्या परीक्षेत शेख फायजा गयास हिने 88 टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम, तर शेख इशरा अनवर हिने 81 टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला.

**बारावीतील गुणवंत विद्यार्थी |** विज्ञान शाखेत सय्यदा आयेशा सिद्दीखा अश्फाक हिने प्रथम क्रमांक मिळवला असून इनामदार मरियम हसनोद्दीन शेख हिने द्वितीय क्रमांक मिळवला. तर कला शाखेत शेख अरिबा जब्बार हिने प्रथम, तर असलम हैदर खान यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. याचबरोबर विद्यालयाची माजी विद्यार्थिनी नगमा मुख्तार खान हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा उत्तीर्ण करून महसूल सहाय्यक पदावर निवड मिळवत विद्यालयाचा गौरव वाढवला. तिचा शाळेतर्फे विशेष सत्कार करण्यात आला.

# आंतरभारती दिन उत्साहात साजरा

**आंबाजोगाई |** आंतरभारती शाखा आंबाजोगाईच्या वतीने दिनांक १० मे २०२६ रोजी आंतरभारती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्त “आंतरभारतीतील माझा प्रवास” या विषयावर उपस्थित मान्यवर व सदस्यांनी मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रम सायंकाळी ६ ते ७ या वेळेत प्रा. संतोष मोहिते सरांचे कॉम्प्युटर वर्ल्ड, जयवंती नगर, आंबाजोगाई येथे पार पडला.

आंतरभारती दिन का साजरा केला जातो

आंतरभारती दिन हा भारतातील विविध भाषा, संस्कृती आणि प्रांतांमध्ये बंधुभाव व राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. मराठी साहित्यिक साने गुरुजी यांनी “आंतरभारती” ही संकल्पना मांडली होती. त्यांच्या मते, भारतातील प्रत्येकाने इतर भारतीय भाषा, संस्कृती आणि परंपरांचा आदर करून परस्परांमध्ये प्रेम व समज वाढवली पाहिजे.


DNS Bank Ltd. Ambajogai

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र. सरफेसी/०२/७००२-१२३७/२४/२०२६-२७ दिनांक:-०८.०५.२०२६

**नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे**

प्रति,
१. मे. मैत्री हॉटेल प्रोप्रा.सोमनाथ अशोक फड (कर्जदार)
पत्ता:- वरला वाडा,धर्मापुरी, ता.परळी-वैजनाथ, जि.बीड ४३१५१५
२. श्री. अशोक माणिक फड (सह-कर्जदार)
पत्ता:- वरला वाडा,धर्मापुरी, ता.परळी-वैजनाथ, जि.बीड ४३१५१५
३. श्री.संभाजी माणीकराव चाटे
पत्ता:- मु. लाडझरी, पो. घाटनांदुर ता. परळी-वैजनाथ, जि.बीड ४३१५१५
४. श्री. संजीव बाबुराव मुसळे
पत्ता:- मु.पो.धर्मापुरी, ता.परळी-वैजनाथ,जि.बीड ४३१ ५१५

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

**सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,
**विषय:-** नॉन-परफॉमिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- **मुख्यशाखा-अंबाजोगाई**
**सुचना:-** U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. तुमचे कर्जखाते दिनांक २९.०५.२०२५ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
| --- | --- | --- |
| खाते क्र. ७०५२-१६ रु.१०,००,०००/- | **(मालमत्तेचे मालक-**अशोक माणिक फड) सहकर्जदार/गहाणदार अशोक माणिक फड यांची मौजे धर्मापुरी ता.परळी-वैजनाथ,जि.बीड येथील घर क्र.८७८ ज्याचे क्षेत्रफळ पुर्व पश्चिम २४ फु.X दक्षिण उत्तर ३४ फु त्यावरील बांधकामासह ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- **पुर्व:-** बाबु मुंडे **पश्चिम:-** रस्ता **दक्षिण:-** वामन फड **उत्तर:-** अंबाजोगाई अहमदपुर रोड (वरील मालमत्ता “जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत”) | मुद्दल + व्याज एकुण रु.३,२०,५९०/- दिनांक ३०.०४.२०२६ रोजी + पुढील व्याज @ ११.८५% दिनांक ०१.०५.२०२६ पासुन |

- वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
- अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक **२७.०८.२०२१**
ब. गहाणखत नोंदणी दिनांक **१७.०८.२०२१ (गहाणखत नोंदणी क्र.२७८४/२०२१)**

५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. **मुद्दल + व्याज एकुण रु.३,२०,५९०/- दिनांक ३०.०४.२०२६ रोजी + पुढील व्याज @ ११.८५% दिनांक ०१.०५.२०२६ पासुन** आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक ०८.०७.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला आमच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

**ठिकाण:- अंबाजोगाई**

(श्री. अनंत गोपाळराव देशपांडे)
अधिकृत अधिकारी (Secured Creditor)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई.
मो.७६६६५७७९००



DNS Bank Ltd. Ambajogai

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र. सरफेसी/०२/७०५२-१६/**२२**/२०२६-२७ दिनांक:- ०८.०५.२०२६

**नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे**

प्रति,
१. श्री. भागवत वसंत मुंडे (कर्जदार)
पत्ता:- नागझरी रोड,योगेश्वरी कॉलेज जवळ,अंबाजोगाई, ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
२. सौ. छाया भागवत मुंडे (सह-कर्जदार)
पत्ता:- नागझरी रोड,योगेश्वरी कॉलेज जवळ,अंबाजोगाई, ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
३. श्री.मुंजा श्रीधरराव फड
पत्ता:- मु.पो.वरवटी,ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
४. श्री.विलास वसंत मुंडे
पत्ता:- मु.पो.सोनहिवरा, ता.परळी-वैजनाथ,जि.बीड ४३१५१५

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

**सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,
**विषय:-** नॉन-परफॉमिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- **मुख्यशाखा-अंबाजोगाई**
**सुचना:-** U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. तुमचे कर्जखाते दिनांक २९.०५.२०२५ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
| --- | --- | --- |
| खाते क्र. ७०५२-१६ रु.१०,००,०००/- | **(मालमत्तेचे मालक-भागवत वसंत मुंडे)** गहाणदार/कर्जदार मौजे अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड येथील योगेश्वरी कॉलेज जवळ, नागझरी रोड, नगर परिषद घर क्र.३-२३१७ ज्याचा प्लॉट क्र.१२ सर्वे क्र.८४/४क्षेत्रफळ११.२५मी.X१०.७५मी.= १२०.९३ स्क्वे.मी. हे ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- **पुर्व:-** श्री लोमटे यांच्या प्लॉटींग **पश्चिम:-** प्लॉट क्र.११ **दक्षिण:-** रस्ता **उत्तर:-** प्लॉट क्र.५ (वरील मालमत्ता “जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत”) | मुद्दल + व्याज एकुण रु.९,७२,५७०/- दिनांक ३०.०४.२०२६ रोजी + पुढील व्याज @ ९.००% दिनांक ०१.०५.२०२६ पासुन |

- वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
- अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक **२९.०४.२०२३**
ब. गहाणखत नोंदणी दिनांक **२४.०४.२०२३ (गहाणखत नोंदणी क्र.१९९५/२०२३)**

५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. **मुद्दल + व्याज एकुण रु.९,७२,५७०/- दिनांक ३०.०४.२०२६ रोजी + पुढील व्याज @ ९.००% दिनांक ०१.०५.२०२६ पासुन** आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक ०८.०७.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला आमच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

**ठिकाण:- अंबाजोगाई**

(श्री. अनंत गोपाळराव देशपांडे)
अधिकृत अधिकारी (Secured Creditor)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई.
मो.७६६६५७७९००



DNS Bank Ltd. Ambajogai

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र. सरफेसी/०२/७००२-१२२२/**२३**/२०२६-२७ दिनांक:-०८.०५.२०२६

**नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे**

प्रति,
१. श्री. ज्ञानेश्वर गोपीनाथ खुळे (कर्जदार)
पत्ता:- घर क्र.४०४७, जोगाईवाडी, ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
२. सौ. शुभांगी ज्ञानेश्वर खुळे (सह-कर्जदार)
पत्ता:- घर क्र.४०४७, जोगाईवाडी, ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
३. सौ.पावर पुष्पा सदाशिव
पत्ता:- कुत्तर विहीर, अंबाजोगाई,ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
४. श्री.उमेश दादासाहेब नांदे
पत्ता:- बावाची युसुफ वडगाव, ता.केज,जि.बीड ४३१ १२३
५. श्री.मोरे भाऊसाहेब संभाजी
पत्ता:- आनंद नगर, अंबाजोगाई जि.बीड ४३१५१७

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

**सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,
**विषय:-** नॉन-परफॉमिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- **मुख्यशाखा-अंबाजोगाई**
**सुचना:-** U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. तुमचे कर्जखाते दिनांक २९.०८.२०२५ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
| --- | --- | --- |
| खाते क्र. ७००२-१२२२ रु.१५,००,०००/- | **(मालमत्तेचे मालक-ज्ञानेश्वर गोपीनाथ खुळे)** गहाणदार/कर्जदार ज्ञानेश्वर गोपीनाथ खुळे हे मौजे जोगाईवाडी ता.अंबाजोगाई जि.बीड येथील घर क्र.४०४७ ज्याचा प्लॉट क्र.११२ ज्यांचा सर्वे क्र.३८३/१ज्यांचे क्षेत्रफळ पुर्व पश्चिम दक्षिण बाजु १२.५० मी ज्याची पुर्व पश्चिम उत्तर बाजु १२ मी दक्षिण उत्तर बाजु ९ मी एकुण ११०.२५ स्वे.मी.ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- **पुर्व:-** ६ मी रस्ता **पश्चिम:-** सर्वे नं.३८३ ची जागा **दक्षिण:-** प्लॉट क्र.११३ **उत्तर:-** प्लॉट क्र.१११ (वरील मालमत्ता “जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत”) | मुद्दल + व्याज एकुण रु.१४,००,१५८/- दिनांक ३०.०४.२०२६ रोजी + पुढील व्याज @ १४.००% दिनांक ०१.०५.२०२६ पासुन |

- वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
- अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक **१४.०१.२०२१**
ब. गहाणखत नोंदणी दिनांक **०८.०१.२०२१ (गहाणखत नोंदणी क्र.२१३/२०२१)**

५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. **मुद्दल + व्याज एकुण रु.१४,००,१५८/- दिनांक ३०.०४.२०२६ रोजी + पुढील व्याज @ १४.००% दिनांक ०१.०५.२०२६ पासुन** आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक ०८.०७.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला आमच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

**ठिकाण:- अंबाजोगाई**

(श्री. अनंत गोपाळराव देशपांडे)
अधिकृत अधिकारी (Secured Creditor)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई.
मो.७६६६५७७९००

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गोळेगाव जवळील कॅनॉलमध्ये शेतकऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

## सिध्देश्वर धरणातील पाणी केळी तलावात उपसा करून टाकण्याची शेतकऱ्यांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मे**

औंढा नागनाथ तालुक्यातील सिद्धेश्वर धरणातील पाणी उपसा करून केळी तलावात सोडण्याच्या प्रमुख मागणीसाठी तालुक्यातील येळी, केळी, केळी तांडा, सावळी पार्डी,उंडेगाव, हिवरखेडा, साळणा, अनखळी, सावळी खुर्द या गावातील शेतकऱ्यांनी सोमवारी ११ मे रोजी एक तास सकाळी ११ ते १२ वाजे दरम्यान गोळेगाव जवळून वाहणाऱ्या कॅनॉलमध्ये जलसमाधी आंदोलन केले.

तालुक्यातील सावळी पार्डी, केळी तांडा, केळी, हिवरखेडा, साळणा, अनखळी, सावळी खुर्द,येळी यासह अनेक गावच्या पिण्याचे पाणी व शेती सिंचन केळी तलावावर अवलंबून आहे. परंतु केळी तलाव दरवर्षी उन्हाळ्याच्या सुरुवातीसच आटून जातो. त्यामुळे या गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठा निर्माण होतो. शेती कोरडवाहू होते. तसेच शेतीही सिंचनाखाली राहत नाही त्यामुळे सिद्धेश्वर धरणातून पाणी उपसा करून केळी तलावात सोडण्याची मागणी शेतकऱ्यांनी या जलसमाधी आंदोलनाद्वारे केली. एकनाथ नागरे, गंगाराम घुगे, अमोल सांगळे, बालाजी सांगळे, भास्कर आघाव, निवास सांगळे, विठ्ठल सांगळे ,संतोष मोरगे, शुभम सांगळे, संतोष नागरे, गजानन कुटे, विश्वनाथ सांगळे, ननु खिलारे या १३ शेतकरी जलसमाधी आंदोलन केले.

यावेळी बोलताना शेतकऱ्यांनी केळी तलावात पाणी उपलब्ध झाल्यास या गावातील जनावरे व नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागतो तसेच हजारो हेक्टर शेती सिंचनाखाली येते त्यामुळे तात्काळ सिद्धेश्वर धरणातून पाणी उपसा करत केळी तलावात सोडण्याची मागणी शेतकऱ्यांनी लावून धरली तसेच या जिल्ह्यातील पाणी पर जिल्ह्यात जात असल्याने व येथील शेतकरी पाण्यापासून वंचित राहत असल्याने शेतकरी चांगलेच आक्रमक झाले होते. आंदोलनादरम्यान उपविभागीय अभियंता हिंगोली पूर्णा पाटबंधारे विभाग वसमतचे विक्रम पत्की, दप्तर कारकून जिरवणकर, सहाय्यक अभियंता पूर्णा पाटबंधारे शिवाजी मोळवंडे, कालवा निरीक्षक शिवकांत गिऱ्हे, कालवा निरीक्षक शिवाजी घुगे, विक्रम कुटे, एस एस घुगे,व्ही बी कुटे,जी एस काळे, तलाठी नितीन अभोरे यांची उपस्थिती होती. पूर्णा पाटबंधारे विभाग व महसूल विभाग, पोलीस प्रशासन यांना यावेळी शेतकऱ्यांनी निवेदन दिले. तसेच पोलीस पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, पोलीस उपनिरीक्षक शेख खुद्दूस,पोलीस उपनिरीक्षक दत्ता कानगुले, पोलीस उपनिरीक्षक श्रीधर वाघमारे, उप निरीक्षक अमोल इंगोले,जमादार दिलीप नाईक, सुभाष जयताडे, वसीम पठाण, गजानन गिरी, सुरेश डाखोरे, विजय कालवे, राजकुमार कुटे, वसंत चव्हाण, जयदीप जाधव, विजय कालवे, अमोल चव्हाण, शेख इकबाल, माधव सूर्यवंशी, सइद सय्यद, हेमराज गीते, ओंकारेश्वर राजनेकर यांच्यासह पोलीस कर्मचारी यांनी बंदोबस्त ठेवला होता.



केळी तलावातील पाण्यामुळे आमच्या गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटत असतो. परंतु या केळी तलावात पाण्याचा साठा फक्त डिसेंबर जानेवारीपर्यंत राहतो. त्यामुळे आमच्या गावातील पिण्याच्या पाण्याचे सर्व सोर्स फेब्रुवारीपासून पावसाळा लागेपर्यंत कोरडे पडतात. त्यामुळे केळी तलावावर अवलंबून असणारे २० ते २५ गावं ओसाड होत आहेत. त्यामध्ये पार्डी, सावळी खु. केळी, केळी तांडा, येळी, उंडेगाव, हिवरखेडा, रामेश्वर, दौडगाव, लांडाळा, उखळी, चिंचोली निळोबा, साळणा, अनखळी, गोजेगाव, जलालपूर, देवसडी, वाडी, आदि गावांमध्ये भिषण पाणीटंचाई होत असून नागरीकांना, जनावरांना व शेतीसाठी पाण्याअभावी वणवण भटकंती करावी लागत असते त्यामुळे आमच्या गावातील पिण्याचा पाण्याचा गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी केळी तलावामध्ये पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.फेब्रुवारी ते पावसाळा चांगला होईपर्यंत सिद्धेश्वर तलावातील पाणी उपसा करून केळी तलावामध्ये टाकणे आवश्यक आहे. केळी तलावामध्ये पाणी टाकण्यासंबंधी तात्काळ योजना तयार करावी, जेणेकरून या तलावावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल व व या परिसरातील शेतकऱ्यांची शेती सिंचनाखाली येईल.

# हिंगोली शहराच्या स्वच्छतेसाठी नगर पालिकेचे पाऊल, नगराध्यक्षा, मुख्याधिकारी यांचेहस्ते ७०० व्यापाऱ्यांना डस्टबिनचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मे**



शहरातील बाजारपेठेतील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी हिंगोली नगरपालिकेने एक कौतुकास्पद आणि अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. शहरातील मुख्य बाजारपेठेत पसरणारे कचऱ्याचे साम्राज्य रोखण्यासाठी नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. रेखाताई श्रीराम बांगर यांच्या संकल्पनेतून शहरातील तब्बल ७०० ते ८०० व्यापाऱ्यांना डस्टबिनचे (कचरा कुंडी) प्रत्यक्ष दुकानावर जाऊन वाटप करण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून बाजारपेठेत अस्वच्छता वाढत असल्याचे नगराध्यक्षांच्या निदर्शनास आले होते. केवळ दंड आकारण्यापेक्षा व्यापाऱ्यांना स्वच्छतेच्या प्रवाहात सामील करून घेण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी नगराध्यक्षांनी स्वतः व्यापाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांना ओला व सुका कचरा डस्टबिनमध्येच टाकण्याचे आवाहन केले.

या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी कळमनुरीचे आमदार संतोष बांगर यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी बोलताना त्यांनी नगराध्यक्षांच्या या कामाचे कौतुक केले. ते म्हणाले की, हिंगोली शहर सुंदर आणि स्वच्छ ठेवणे ही केवळ पालिकेचीच नाही, तर प्रत्येक नागरिकाची आणि व्यापाऱ्याची जबाबदारी आहे. व्यापाऱ्यांनी पालिकेला सहकार्य करून कचरा रस्त्यावर न टाकता डस्टबिनचा वापर करावा.

या मोहिमेत मुख्याधिकारी अरविंद मुंडे, शिवसेना गटनेते श्रीराम बांगर, उपनगराध्यक्ष माबूद बागवान यांच्यासह पालिकेचे सर्व नगरसेवक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, संदीप घुगे, अभियंता प्रतीक नाईक यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुभाष बांगर, राम कदम, कपिल खंडेलवाल, चंदू लव्हाळे, साद अहमद, सज्जाद बिल्डर, गणेश बांगर, रवींद्र वाडे, निधी गोरे, सुरभी चौधरी, रामकिसन बांगर, सुमित कांबळे, खली बांगर, श्याम कदम, विशाल गोठरे यांनी परिश्रम घेतले. तसेच स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, पंडित मस्के, अक्षय देशमुख आणि कैलास थिटे यांच्यासह स्वच्छता कर्मचाऱ्यांची मोठी फौज यावेळी तैनात होती.

यावेळी नगराध्यक्षा सौ रेखा बांगर म्हणाल्या की, बाजारपेठ ही शहराचे हृदय असते. ते स्वच्छ राहिल्यास शहराचे आरोग्य चांगले राहील. व्यापाऱ्यांनी दिलेले डस्टबिन वापरावेत आणि आपल्या शहराला 'नंबर वन' करण्यासाठी सहकार्य करावे.




**हिंगोली– शहरातील महाराणा प्रताप चौकात वीरशिरोमणि महाराणा प्रतपासिंह यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष सावरमल अग्रवाल, राजेंद्र हलवाई, राजपूत समाजाचे जिल्हाध्यक्ष अरूणसिंह ठाकूर, भीमण पल्लेवार, विश्वजीतसिंह गहीलोत, आशिष मेहता, अजयसिंह ठाकूर विठ्ठल खंडागळे, अक्षय अग्रवाल, दिगंबर टाक आदी. छाया– सुनील पाठक**

# वाशिम-वारंगाफाटा महामार्गावर दुरूस्तीची वेळ, कामावर प्रश्नचिन्ह



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मे**

वाशिम ते वारंगाफाटा या ७६ किमी राष्ट्रीय महामार्गावर खानापूरचित्ता शिवारात रस्त्यावरील संपूर्ण पॅनलच बदलण्याची वेळ आली आहे. या ठिकाणी अवघ्या तीन वर्षातच दुरूस्तीचे काम करावे लागत आहे. वारंवार होणाऱ्या दुरूस्तीच्या कामामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाकडून वाशिम ते वारंगा फाटा हा सुमारे ७६ किमीच्या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले होते. या कामावर सुमारे १९७६ कोटी रूपयांचा खर्च करण्यात आला आहे. या महामार्गामुळे वाशिम ते वारंगाफाटा मार्गावरील वाहतुक सुरळीत होऊन गतीमान प्रवास होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. त्यानंतर या रस्ते कामांचे उद्‌घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेहस्ते झाले. मात्र रस्त्यांचे उद्‌घाटन झाल्यानंतर तीन वर्षातच सिमेंट रस्त्यावर भेगा पडू लागल्या होत्या. त्यानंतर कंत्राटदाराने या भेगा बुजविल्या मात्र आता त... भेगा वाढल्यामुळे चक्क पॅनलच बदलण्याची वेळ आली आहे. हिंगोली तालुक्यातील खानापूर चित्ता शिवारात पुन्हा एकदा रस्ता खोदकाम करून पॅनल बदलण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हे कामही संथगतीने सुरू असल्यामुळे रात्रीच्या वेळी अपघाताची शक्यता वाढली आहे. या राष्ट्रीय महामार्गाच्या अवघ्या तीन वर्षातच होणाऱ्या दुरूस्तीमुळे कामाच्या दर्जाचे पितळ उघडे पडले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### मयुरी लोंढे हीचे दहावी परीक्षेत नेत्रदीपक यश



हिंगोली– एस. एस. सी. बोर्ड छत्रपती संभाजीनगर अंतर्गत घेण्यात आलेल्या दहावी मार्च २०२६ च्या परिक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला असून औंढा नागनाथ तालुक्यातील लाख येथील मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील मयुरी गजानन लोंढे हिने ९५.२० टक्के गुण घेत शाळेतून प्रथम क्रमांक मिळविला आहे. मयुरीने मराठीत ८५, हिंदीत ८८, इंग्रजीत ९५, मॅथेमॅटीक्स ९६, सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजीमध्ये ९८, सोशल सायन्समध्ये ९९ गुण मिळविले आहेत. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, मित्र मंडळी, नातेवाईक त्याच बरोबर वडील गजानन लोंढे व आई आश्विनी लोंढे यांनी मयुरीचे विशेष अभिनंदन केले. या नेत्रदीपक यशाबद्दल मयुरीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### तरूणांना व्यसनमुक्तीच्या प्रवाहात आणा




हिंगोली– शालेय-महाविद्यालयीन, कुमारवयीन मुले, युवकांना जनजागृतीच्या माध्यमातून व्यसनमुक्तीच्या प्रवाहात आणणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सिनेअभिनेते तथा महाराष्ट्र शासन नियुक्त व्यसनमुक्ती ब्रँड अॅम्बेसेडर सिद्धार्थ जाधव यांनी नांदेड येथे हिंगोली जिल्ह्यातील व्यसनमुक्ती चळवळीतील कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांना दि. ७ गुरूवारी केले आहे. नांदेड येथे सांस्कृतिक कार्यक्रमातील फावल्या वेळेत सिनेअभिनेते सिद्धार्थ जाधव यांनी व्यसनमुक्तीचा प्रचार आणि प्रसार उपक्रम राबविणाऱ्या नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्यच्या कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना संवाद साधला. नशाबंदी मंडळाचे कार्यकर्ते विशाल अग्रवाल, नशामुक्त भारत अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या स्टुडंट्स प्रहरी क्लबच्या मार्गदर्शिका शुभदा सरोदे, व्यसनमुक्ती दूत मृण्मयी अग्रवाल आदींची उपस्थिती होती. सिनेअभिनेते सिद्धार्थ जाधव यांनी वाढत्या व्यसनाधीनतेच्या समस्येवर चिंता व्यक्त केली. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा अंतर्गत, महाराष्ट्र शासनाचे व्यसनमुक्ती धोरण-२०११, तंबाखूमुक्त शाळा अभियान, नशामुक्त भारत अभियान आदी विधायक उपक्रम विविध शैक्षणिक संकुलामध्ये राबविण्याचा कानमंत्र व्यसनमुक्ती चळवळीतील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना दिला आहे.

# शिवपुरी महाराज विद्यालयात १० वी, १२ वीतील गुणवंतांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मे**

नांदापूर येथील शिवपूरी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १० वी व १२ वी परीक्षेत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्याहस्ते करण्यात आला.

या विद्यालयाचा १० वीचा निकाल ८२.९२ तर बारावीचा निकाल ५० टक्के लागला आहे. १२ वीत प्रथम कु अवंतीका जळते तर १० वीतून प्रक्म कु अर्पिता पतंगे ७९.८० टक्के गुण, द्वितीय कु वैष्णवी कल्याणकर ७७.४० टक्के, तृतीय नंदीनी गिरगावकर ७४.६० टक्के गुण मिळवले आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सोमवारी सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दिलीप चव्हाण, पालक मल्लिकार्जून गिरगावकर, ज्ञानेश्वर कल्याणकर, शंकरराव देशमुख, प्रकाश बर्गे यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# जलजीवन मिशन योजनेचा बळसोंड ग्रामपंचायतीत शुभारंभ, ग्रामस्थांमध्ये आनंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मे**

हिंगोलीजवळील बळसोंड ग्रामपंचायत परिसरातील नागरिकांसाठी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ सोमवारी उत्साहात पार पडला. या योजनेचे उद्घाटन गावाचे सरपंच शैलेश जैस्वाल यांच्या हस्ते करण्यात आले.

गेल्या अनेक दिवसांपासून गावात शुद्ध व नियमित पाणीपुरवठ्याची मागणी होत होती. यासाठी सरपंच शैलेश जैस्वाल यांनी सातत्याने पाठपुरावा करून शासनस्तरावर प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याने गावात जलजीवन मिशन योजनेचे पाणी पोहचले आहे.

जल क्रांती पॅनलने दिलेला शब्द पूर्ण करत गावात पाणी आणून दाखवले, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. बळसोंड गावातून सुरू झालेल्या या योजनेमुळे मुळगावापर्यंत पाणी पोहोचले असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, नवीन रस्त्याच्या कामामुळे काही ठिकाणी पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता असली तरी लवकरात लवकर योजनेचे काम पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

या योजनेमुळे महिलांची पाण्यासाठी होणारी धावपळ कमी होणार असून गावात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी सरपंच शैलेश जैस्वाल व संबंधित सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

# राष्ट्रीय लोकअदालतीत १०० प्रकरणांचा निपटारा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मे**

येथील जिल्हा व सत्र न्यायालयात शनिवारी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये १०० पेक्षा जास्त प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

अॅड सुरेश गडदे यांच्या कार्यालयातील १०३ प्रकरणांचा समावेश आहे. या प्रकरणांच्या यशस्वी तडजोडीसाठी जिल्हा न्यायधीश टी एस अकाली, न्यायधीय एस एन माने, सतेच तदर्थ जिल्हा न्यायधीश आर एस रोटे, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच विविध विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

यावेळी कार्यालयातील सहकारी अॅड मनिषा गडदे, अॅड अर्धापूरकर, अॅड मस्के, अॅड जगताप, अॅड लेकुळे आदींनी परिश्रम घेतले. लोकअदालतीमुळे सर्वसामान्यांना दीर्घकाळ चालणाऱ्या न्यायालयीन प्रक्रीयेतून मुक्तता मिळत आहे.

# जिल्ह्यात 'भैय्यां'नी मशाल ठेवली तेवत तर 'भाऊं'नी पंजाला दिले नवसंजीवनीचे बळ!





### गद्दार गेले, पण महेश नळगेंसारखे निष्ठावंत उभे राहिले; म्हणूनच जिल्ह्यात अजूनही मशाल पेटलेली आणि पंजा पुन्हा उभारी घेत आहे!

### शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगेंच्या नेतृत्वाकडे युवकांचा वाढता ओघ; काँग्रेसला राजाभाऊ देशमुखांनी दिला नवसंजीवनीचा श्वास

**तभा वृत्तसेवा**
**जालना । सुरेश कवडे पाटील**

राज्यात गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या राजकीय भूकंपाने अनेक पक्षांचे अस्तित्व हादरून गेले. सत्ता, पदे आणि स्वार्थासाठी पक्षांशी गद्दारी करणाऱ्या अनेक नेत्यांनी आपली राजकीय पोळी भाजून घेतली, मात्र या सर्व गदारोळात काही मोजकीच नेतृत्वे अशी होती ज्यांनी पक्षनिष्ठा, कार्यकर्त्यांचा विश्वास आणि जनतेशी असलेली बांधिलकी कायम ठेवली. जालना जिल्ह्यात उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि काँग्रेस पक्षाला आलेल्या कठीण काळात दोन नावे ठळकपणे पुढे आली, ती म्हणजे शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगे आणि काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख.

राजाभाऊ देशमुख यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात काँग्रेस पुन्हा सक्रिय होत असल्याचे चित्र दिसू लागले आहे. विशेषतः ग्रामीण भागात काँग्रेसचे पारंपरिक मतदार पुन्हा पक्षाकडे वळताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी युवक आणि ज्येष्ठ कार्यकर्ते पुन्हा संघटनात्मक कामात सक्रिय झाले आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेसला नव्याने बळ मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

राज्यातील बदललेल्या राजकीय परिस्थितीत पक्षाशी निष्ठा ठेवणारे आणि प्रतिकूल परिस्थितीतही संघटना टिकवून ठेवणारे नेते आज पक्षासाठी सर्वात मोठी ताकद ठरत आहेत. जालना जिल्ह्यात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख महेश नळगे आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी अत्यंत कठीण काळात पक्ष संघटना जिवंत ठेवण्याचे मोठे काम केले आहे. त्यामुळे आता पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वानेही या दोन्ही नेत्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे. शिवसेनेत झालेल्या फुटीनंतर अनेकांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली, तर काँग्रेसमध्ये देखील निवडणुकीच्या तोंडावर अनेक संधीसाधूंनी पक्षांतर करत आपला स्वार्थ साधला. मात्र या सर्व परिस्थितीत महेश नळगे आणि राजाभाऊ देशमुख यांनी कार्यकर्त्यांना एकत्र ठेवत संघटना टिकवली. गावागावात पक्षाचे अस्तित्व कायम ठेवले. त्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांमध्ये या दोन्ही नेत्यांविषयी विश्वास आणि आत्मीयता निर्माण झाली आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, जालना जिल्ह्यात सध्या भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गट सत्तेच्या बळावर राजकारण करत असले तरी तळागाळात निर्माण होणारा असंतोष भविष्यात मोठे राजकीय समीकरण बदलू शकतो. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि काँग्रेसने जर अशीच संघटनात्मक ताकद वाढवत ठेवली तर आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये सत्ताधाऱ्यांसमोर मोठे आव्हान निर्माण होऊ शकते.

#### ज्यांनी पक्ष विकला ते सत्तेत गेले, ज्यांनी पक्ष वाचवला ते जनतेच्या मनात गेले!

» महेश नळगे यांनी जिल्ह्यातील नाराज, खचलेले आणि राजकीयदृष्ट्या संभ्रमात गेलेले कार्यकर्ते पुन्हा एकत्र आणण्याचे मोठे काम केले. तालुक्यापासून गाव–पातळीपर्यंत संघटन बांधणी करत त्यांनी पक्षाची मशाल विझू दिली नाही. विशेष म्हणजे युवकांमध्ये त्यांनी मोठ्या प्रमाणावर विश्वास निर्माण केला आहे. अनेक तरुणांनी पुन्हा उबाठा शिवसेनेकडे ओढा दाखवण्यास सुरुवात केली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात पक्ष पुन्हा एकदा ताकदीने उभा राहताना दिसत आहे. गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यात विविध आंदोलनं, जनसंपर्क दौरे, शेतकरी प्रश्न, बेरोजगारी, प्रशासनाविरोधातील आक्रमक भूमिका या माध्यमातून महेश नळगे यांनी शिवसेनेची ओळख केवळ सोशल मीडियापुरती मर्यादित ठेवली नाही, तर रस्त्यावर उतरून संघर्ष करणारा पक्ष अशी निर्माण केली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सामान्य शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

#### सत्ता गेली म्हणून लढाई संपत नाही; निष्ठा जिवंत असेल तर पक्ष पुन्हा उभा राहतो!

» दुसरीकडे, देशभरात काँग्रेस पक्षाची झालेली पडझड आणि राज्यात निर्माण झालेली मरगळ पाहता जालना जिल्ह्यात काँग्रेस पूर्णपणे संपुष्टात येईल की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली होती. निवडणुकीच्या तोंडावर अनेक स्वार्थी नेत्यांनी काँग्रेसची साथ सोडून इतर पक्षांमध्ये प्रवेश केला. काहींनी तर काँग्रेसचा वापर केवळ स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी केला आणि योग्य वेळ येताच पक्षाशी गद्दारी केली. मात्र अशा कठीण काळात काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी शांत पण संघटित पद्धतीने पक्षाची घडी बसवण्यास सुरुवात केली. त्यांनी तळागाळातील कार्यकर्त्यांशी थेट संपर्क साधला. पक्षातील जुन्या निष्ठावंतांना पुन्हा सक्रिय केले. गावागावांत बैठका, जनसंवाद आणि संघटनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून काँग्रेसला नवसंजीवनी देण्याचे काम केले.



#### “ ज्यांनी पक्ष वाचवला, त्यांनाच आता पक्षाने ताकद देण्याची वेळ आली आहे!

शिवसेना पक्षातील दिग्गज नेते आणि विधानपरिषदेचे सदस्य अंबादास दानवे यांनी जालना जिल्ह्यातील परिस्थिती लक्षात घेऊन महेश नळगे यांच्या नेतृत्वाला अधिक बळ देण्याची गरज असल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे. कारण अनेक संकटांच्या काळात महेश नळगे यांनी पक्षाची मशाल तेवत ठेवत युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण केले आहे. संघटनात्मक स्तरावर त्यांनी केलेले काम पक्षासाठी भविष्यात मोठी ताकद ठरू शकते, असे मत व्यक्त होत आहे. दुसरीकडे काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि जालना जिल्ह्याचे खासदार कल्याण काळे यांनी देखील जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या कार्यपद्धतीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे. कारण काँग्रेस संपल्याच्या चर्चा सुरू असताना राजाभाऊ देशमुख यांनी कार्यकर्त्यांमध्ये नवसंजीवनी निर्माण केली आहे. ग्रामीण भागात पुन्हा काँग्रेस सक्रिय करण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आता दिसून येत आहेत.





## संक्षिप्त



**तभा वृत्तसेवा**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय, जालना येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दिवंगत नेते सुरेशकुमार जेथलिया यांना श्रद्धांजली अर्पण करतांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रवक्ते तथा प्रदेश सरचिटणीस सुरजदादा चव्हाण, जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण व युवक प्रदेश सरचिटणीस धैर्यशील भैय्या चव्हाण व आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महिलेने व्यापाऱ्याकडून १० लाखांची खंडणी उकळली

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

लग्नाच्या बॉण्डवर जबरदस्तीने सह्या करून घेणे आणि त्यानंतर बलात्कारासह विविध कलमान्वये खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देऊन १० लाख रुपयांची खंडणी उकळल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी तक्रारीवरून व्यापाऱ्याच्या संशयित पूजाकुमारी पिता भिकारी हरीजन, रत्नाकरदास हरीजन व इतर दोन महिला (सर्व रा. बंशीपूर, जिल्हा बांका, बिहार) यांच्याविरुद्ध चंदनझिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार तबरेज अंसारी उमर अंसारी (वय ३२, रा. बन्सीपूर, बिहार, ह. मु. सोरटी नगर, जालना) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ११ जुलै २०२४ पासून हा प्रकार सुरू आहे. संशयित पूजाकुमारी हिने तबरेज यांना धमकावून लग्नाच्या बॉण्डवर जबरदस्तीने सह्या करून घेतल्या. त्यानंतर पैशांची मागणी पूर्ण न केल्याच्या रागातून त्यांच्याविरुद्ध महिला अत्याचाराचा खोटा गुन्हा दाखल केला. हा गुन्हा मागे घेण्यासाठी संशयितांनी तबरेज यांच्याकडून १० लाख रुपये खंडणी स्वरूपात वसूल केले. मात्र, एवढ्यावरच समाधान न मानता आरोपींनी पुन्हा ४० लाख रुपयांची मागणी केली. ही रक्कम देण्यास नकार दिल्याने तबरेज यांच्याविरुद्ध 'अ‍ॅट्रॉसिटी'चा खोटा गुन्हा दाखल केला. सध्या तबरेज जालना येथील सोरटी नगरमध्ये असतानाही त्यांना वारंवार फोन करून धमकावले जात आहे. 'पुन्हा ४० लाख द्या, अन्यथा बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करू,' अशी धमकी पूजाकुमारी आणि साथीदार देत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## नाफेड खरेदी केंद्राकडून शेतकऱ्यांची पिळवणुक!

**तभा वृत्तसेवा**
**परतुर । प्रतिनिधी**

परतूर तालुक्यात नाफेड खरेदी केंद्र चालकाकडून शेतकऱ्यांची लूट होत असून, या माध्यमातून शासनाचीही फसवणूक सुरु असल्याने या केंद्रा–वरील हरभरा खरेदीची चौकशी करावी, अशी मागणी आझाद क्राती सेनेचे अध्यक्ष दगडूबा घोडे यांनी केली आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात श्री. घोडे यांनी पुढे म्हटले आहे की, परतूर तालुक्यात नाफेडचे ९ खरेदी केंद्र सुरु असून, या केंद्रावर शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारच्या सोयी–सुविधा उपलब्ध न करुन देता शासनाचे नियम डावलून हरभरा खरेदी करण्यात येत आहे. परतुर शहरात ३ दैठणा येथे ३, आष्टी येथे १, सातोना येथे १ आणि वाटुर येथे १, असे एकुण ९ खरेदी केंद्र सुरु आहेत.

यातील बहुतांश खरेदी केंद्रावर अनियमितता व गैरव्यवहार होत असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. हरभरा घेवून आलेल्या शेतकऱ्यांची वाहने रांगेत उभी करुन ठेवली जात असून, त्यांना कुठल्याही सोयी–सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत. अनेक खरेदी केंद्रावर पिण्याचे पाणी उपलब्ध नसून तक्रार नोंदविण्याची व्यवस्थाही केलेली नाही. डिजिटल नोंदणी केली जात नसून पावतीही देण्याची व्यवस्था नाही. वेळेवर टोकन क्रमांक प्रणाली असावी लागते. मात्र, याकडेही दुर्लक्ष असून, खरेदीचा एमएसपी फलक केंद्रावर नाही, शेतकऱ्यांचा माल खरेदी कमी आणि व्यापाऱ्याकडून खरेदी सर्वात जास्त करण्यात येत आहे. या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांचा माल खरेदी केला जातोय की व्यापाऱ्यांकडून खरेदी करण्यात आला याचीही शहानिशा होणे आवश्यक आहे. यातील बहुतांश खरेदी केंद्रावर हमाली नावाखाली शेतकऱ्यांकडन जास्तीचे पैसे उकलले जात असन वजन काट्यात तफावत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. त्याचबरोबर मालाचे पैसे वेळेवर मिळत नसून इतर सुविधांची वानवा आहे. हा एकुणच गैरप्रकार पाहता नाफेडच्या या हरभरा खरेदी केंद्राची तपासणी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच शेतकऱ्यांना आवश्यक त्या सोयी–सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. वाटुर येथे श्रीराम आनंद अपंग औद्योगिक संस्थेचे अध्यक्ष वसंत अनभुले यांच्या नाफेड खरेदी केंद्रात अनेक प्रकारच्या अनियमितता असून, या केंद्रासह इतर केंद्रांची चौकशी करावी, अशी मागणी दगडोबा घोडे यांनी या निवेदनाच्या शेवटी केली आहे.

## ११ वर्षापूर्वी हरविलेल्या मुलाची 'आधार'मुळे आई–वडिलांशी भेट!



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

'देवासमोर दिवा लावला की कधी ना कधी अंधार दूर होतोच', याची प्रचिती जालना जिल्ह्यातील कड कुटुंबाला ११ वर्षांनंतर आली आहे. २०१५ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथून हरविलेला १५ वर्षांचा मुलगा आता २६ वर्षांचा झाला असून, केवळ एका 'आधार कार्ड' अपडेटमुळे जालना पोलिसांना त्याचा शोध लावण्यात यश आले. ११ वर्षांनंतर पोटच्या गोळ्याला समोर पाहून आई–वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

मिळालेल्या माहितीनुसार, जाफ्राबाद तालुक्यातील पिंपळगाव कड येथील रहिवासी समाधान तेजराव कड (वय ५१) हे २०१५ मध्ये कुटुंबासह कामासाठी गंगापूर तालुक्यातील आशेगाव चौक येथे गेले होते. १० जानेवारी २०१५ रोजी त्यांचा मुलगा सोमीनाथ (त्यावेळी वय १५ वर्ष) हा दौलताबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झाला. पालकांनी सर्वत्र शोध घेतला, पोलिसांत तक्रारही केली; मात्र तब्बल ११ वर्षे उलटूनही सोमीनाथचा पत्ता लागला नव्हता. आधार कार्ड ठरले 'देवदूत' ७ मे २०२६ रोजी समाधान कड यांच्या गावी पोस्टाद्वारे सोमीनाथचे आधार कार्ड प्राप्त झाले. म ुलाने कुठेतरी आपले आधार कार्ड अपडेट केल्याचे आणि तो सुखरूप असल्याचे पालकांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने जालना पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांची भेट घेऊन मदतीचे आवाहन केले. तांत्रिक विश्लेषण आणि शोध पोलीस अधीक्षक संधू यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना तपासाचे आदेश दिले.

पोलिसांनी आधार कार्डवरील माहितीचे तांत्रिक विश्लेषण केले असता, सोमीनाथ हा नाशिक जिल्ह्यातील वडनेर खाकुर्डी येथे असल्याची माहिती मिळाली. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने नाशिकला रवाना झाले. तेथील स्थानिक पोलिसांच्या मदतीने शोध घेतला असता, सोमीनाथ एका पोल्ट्री फार्मवर काम करताना मिळून आला. पोलिसांनी त्याची विचारपूस करून खातरजमा केली आणि त्याला जालन्यात आणून पालकांच्या स्वाधीन केले. ११ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर मुलाची भेट झाल्याने कड कुटुंबाने पोलिसांचे आभार मानले आहेत. या पथकाने केली कारवाई सदर कामगिरी पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ, अंमलदार जगदीश बावणे, दीपक घुगे, सागर बाविस्कर आणि सायबर पोलीस ठाण्याचे सचिन मांटे यांनी फत्ते केली.

## अध्यक्ष आणि जितेंद्र अग्रवाल यांची संपत्ती जप्त करून ठेवीदारांची देणी द्यावी - सुभाषचंद्र देविदान

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

बहुचर्चित स्व. मोतीराम अग्रवाल जालना मर्चेंद को–ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळात पूर्वीपासून असलेला बेबणाव, अध्यक्ष आणि जितेंद्र अग्रवाल यांच्या हुकूमशाहीचा तमूना पुन्हा एकदा समोर आला असून कोट्यावधीच्या घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार बँकेचे अध्यक्ष सी ! ए. गोपाल अग्रवाल आणि मास्टरमाईंड जितेंद्र अग्रवाल यांची जालना शहर व परिसरातील कोट्यावधीची संपत्ती जप्त करून ठेवीदारांची देणी द्यावी असे जाहीर ऐलान संचालक सुभाषचंद्र देवीदान १ यांनी केले आहे. एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सुभाषचंद्र देवीदान यांनी शेतकरी, व्यापारी, उद्योजक ल ळ १ महिला, कष्टकरी, सर्वसामान्य ठेवीदारांच्या कष्टाच्या कमाईवर डल्ला मारणारे मास्टर माईंड जितेंद्र अग्रवाल आणि त्यांच्या इशाऱ्यावर नियमबाह्य काम करणारे अध्यक्ष गोपाल अग्रवाल यांच्या कार्यशैलीची चांगलीच चिरफाड केली. बँकेचे संस्थापक स्व. मोतीराम अग्रवाल यांनी शिस्त आणि काटेकोर नियमानुसार बँकेचो प्रशासन चालवले. मात्र त्यांच्या नंतर जितेंद्र अग्रवाल यांनी मनमानी कारभार चालवला. संचालक मंडळाच्या बैठका, सभा ह्या संचालकांना विश्वासात न घेता अध्यक्षांनी जितेंद्र अग्रवाल यांच्या सोयीनुसार घेतल्या. नियमबाह्य कर्ज वाटप कामांना संचालक मंडळाने विरोध केल्यानंतर ही नियमबाह्य कामांना आळा बसण्याऐवजी वाढतच गेली.



अध्यक्षांचे काम योग्य १. नाही. त्यांना बदलावे यासाठी आपल्यासह संचालक अंकुशराव राऊत, मनोहर सिनगारे, हेमंत ठक्कर, प्रदीप मुथा, प्रविण लाहोटी, मधुसूदन मुत्याल यांनी जितेंद्र अग्रवाल यांच्याकडे मागणी केल्यानंतरही त्यांनी स्वतः ची तुंबडी भरण्यासाठी १ १ अध्यक्षांची पाठराखणच केली. असे सांगून सुभाषचंद्र देवीदान म्हणाले, सामान्य ठेवीदार, ग्राहकांना एक लाख रुपयांचे कर्ज देतांना बँकेचे अध्यक्ष आणि जितेंद्र अग्रवाल हे नियम दाखवत, कागदपत्रांची तपासणी करत होते. मात्र १७७ कर्जदारांना तारण न ठेवता प्रत्येकी २५ लाखांचे कर्ज कसे दिले ? असा प्रश्न सुभाषचंद्र देवीदान यांनी उपस्थित केला. कर्जदाराने तारण ठेवलेल्या १ मालाची आपल्याला माणसे आणि साहित्य घेऊन तपासणी करायची अशी मागणी आपण वारंवार अध्यक्षांकडे केली असता त्यांनी मज्ज़ाव केला. बँकेचे कर्मचारी माल तपासणी करून मालावर बँकेचा टॅग लावून आले आहेत. असे सांगून गोदामात जाऊ देत नसत, स्वतःच्या पारदर्शक कारभाराचा ढोल वाजवणारे अध्यक्ष गोपाल अग्रवाल तारण घेतलेल्या मालाचा खुलासा का करत नाही ? असा प्रश्न सुभाषचंद्र देवीदान यांनी उपस्थित केला. काही कर्जदार पात्र नसतांना त्यांना लालूच दाखवून स्वाक्षऱ्या घेतल्या, नियमबाह्य कर्जे उचलण्यात आली असा आरोप करत घोटाळ्याचा मास्टर माईंड जितेंद्र अग्रवाल आणि अध्यक्ष गोपाल अग्रवाल यांची कोट्यावधींची संपत्ती जप्त करून ठेवीदार, खातेदारांची देणी देऊन व्यवहार सुरळीत करावे असौ सुभाषचंद्र देवीदान यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विभागीय आयुक्तांच्या आदेशानंतरही कारवाई शून्य?
## इस्लापूरातील प्लॉटिंग प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ११ मे -**

किनवट तालुक्यातील इस्लापूर येथे कथित नियमबाह्य प्लॉटिंग प्रकरणाने आता अत्यंत गंभीर वळण घेतले असून, ग्रामपंचायत प्रशासनासह संबंधित शासकीय यंत्रणांच्या भूमिकेवर ग्रामस्थांनी उघडपणे प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. वेळोवेळी लेखी तक्रारी, हरकती, निवेदने आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करूनही प्रत्यक्ष कारवाई होत नसल्याने प्रशासन नेमके कोणाच्या दबावाखाली काम करत आहे? असा संतप्त सवाल आता नागरिकांमधून जोर धरू लागला आहे.

तक्रारदाराने सुरुवातीपासूनच संबंधित प्लॉटिंग व्यवहारांबाबत गंभीर आक्षेप नोंदवत, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अभिप्राय प्राप्त होईपर्यंत कोणताही अंतिम निर्णय घेऊ नये, अशी स्पष्ट मागणी केली होती. मात्र, त्या मागणीला डावलून घाईगडबडीत निर्णय घेण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा गावभर रंगू लागली असून, संपूर्ण प्रकरण आता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

या प्रकरणात दिनांक ११ ऑक्टोबर २०२३ रोजी सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग नांदेड यांच्याकडे स्वतंत्र निवेदन सादर करण्यात आले होते. त्यानंतर २४ नोव्हेंबर २०२३ रोजी पंचायत समिती किनवट तसेच ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत इस्लापूर यांनाही पुन्हा निवेदन देत कथित नियमबाह्य प्लॉटिंगला तात्काळ आळा घालण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अखेर तक्रारदाराने विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे धाव घेतली.

दिनांक ०५ फेब्रुवारी २०२४ रोजी विभागीय आयुक्तांकडे संपूर्ण प्रकरणाची सविस्तर मांडणी करत इस्लापूर येथील सर्वे नंबर १६, १७ आणि २६१ मधील प्लॉटिंग व्यवहारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर उपआयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना स्पष्ट निर्देश देत

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करून अर्जदारास कळवावे, असे आदेश दिले होते. मात्र, या आदेशानंतरही प्रत्यक्ष चौकशीचा अहवाल समोर न आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

**नगररचना कायद्यांचा उघडपणे भंग?**

ग्रामस्थांच्या मते, संबंधित प्लॉटिंग व्यवहारांमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ (चठढझ लीं १९६६) मधील अनेक तरतुदींचे उल्लंघन झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः कोणतेही लेआउट मंजूर करताना रस्ते, गटार व्यवस्था,




पाणीपुरवठा, सार्वजनिक खुली जागा, तसेच सामाजिक सुविधांचे नियोजन करणे बंधनकारक असताना त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप होत आहे.

नगररचना अधिनियमातील कलम १८ व १९ नुसार विकास आराखड्याशी सुसंगत नियोजन करणे आवश्यक असते. तर कलम ४४ नुसार कोणतेही विकासकाम किंवा प्लॉटिंग करण्यापूर्वी सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. याशिवाय कलम ४५ अंतर्गत परवानगीशिवाय करण्यात आलेला विकास बेकायदेशीर मानला जाऊ शकतो. तसेच कलम ५२ नुसार अनधिकृत विकास अथवा नियमबाह्य प्लॉटिंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची स्पष्ट तरतूद आहे.

याशिवाय महाराष्ट्र जमीन महसूल संहिता तसेच ग्रामपंचायत प्रशासनाशी संबंधित नियमांनुसार कृषी जमिनीचे विनापरवानगी निवासी प्लॉटिंग करणे किंवा मूलभूत सुविधांशिवाय भूखंड विक्री करणे हा गंभीर प्रकार मानला जातो. मात्र, संबंधित प्रकरणात केवळ कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून फेरफार नोंदी मंजूर करण्याचा प्रकार झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

**नियम सर्वसामान्यांसाठीच का?**

ग्रामस्थांच्या मते, जर अशाच पद्धतीने नियमबाह्य प्लॉटिंगला संरक्षण मिळत राहिले, तर भविष्यात गावातील रस्ते अरुंद होण्याचा, गटार व्यवस्था कोलमडण्याचा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याचा तसेच सार्वजनिक जागांचा तुटवडा जाणवण्याचा गंभीर धोका आहे. अनधिकृत बांधकामे वाढून गावाचा विकास विस्कळीत होऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे.

शासनाने नगररचना कायद्यांतर्गत स्पष्ट नियम केले आहेत. मग काही जणांसाठी वेगळे नियम आणि सामान्य नागरिकांसाठी वेगळे का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

एका तक्रारदाराने ग्रामपंचायत, पंचायत समिती, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, नगर रचना विभाग ते विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा करूनही जर चौकशीचा निष्कर्ष लागत नसेल, तर प्रशासनातील दिरंगाई आणि उदासीनतेचे हे जिवंत उदाहरण असल्याची चर्चा तालुकाभर सुरू झाली आहे.

**न्यायासाठी सामान्य नागरिकाने अजून किती उंबरठे झिजवायचे?**

सामान्य नागरिकाने न्यायासाठी किती कार्यालयांचे उंबरठे झिजवायचे? ग्रामपंचायतीपासून विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत धाव घेऊनही जर चौकशी होत नसेल, तर प्रशासन नेमके कोणासाठी काम करत आहे? असा संतप्त सवाल आता इस्लापूरकर उघडपणे विचारू लागले आहेत.

इस्लापूरातील या गाजत असलेल्या कथित नियमबाह्य प्लॉटिंग प्रकरणात अखेर निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई होणार का, की हे प्रकरणही इतर अनेक फाईलींसारखे धूळ खात पडून राहणार? याकडे आता संपूर्ण किनवट तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## बोरवाडीच्या विद्यार्थ्यांचे दहावी परीक्षेत यश

**भोकर**-तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील बोरवाडी गाव. गावातील ८० टक्के लोकं रोजंदारीसाठी दरवर्षी सहा महिने आंध्रा आणि तेलंगणात स्थलांतरित होतात. अशा गावातील २३ विद्यार्थ्यांनी दहावी परीक्षेत यश संपादन केले आहे. शहरातील इंग्रजी शाळा सोडा या विद्यार्थ्यांनी कोणतीही खासगी शिकवणी न लावता आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत हे यश संपादन केले आहे.
यामध्ये श्रद्धा टोपाजी कोठूळे हिने ९२.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला असून गौरव बाबुराव टारपे याने ९०.८० टक्के मिळवत दुसरा तर नयन कैलास कोठूळे हिने ८७.८० टक्के गुण मिळवत तिसरा क्रमांक मिळवला आहे तर अंकुश कोंडीबा वानोळे याने ८२.६० टक्के गुण घेत शाकुंतल स्कूल फॉर एक्सलन्स या नांदेड शहरातील शाळेतून तिसरा क्रमांक पटकावला आहे. त्याचबरोबर केदार देविदास कोठूळे, अर्चना माधव ढोले, अंकुश माधव ढोले, विकास मारोती बोथकर, जयशीला अशोक वानोळे, आरती लोभाजी वानोळे, अभिषेक लोभाजी वानोळे, आनंदराव दिगंबर खंदारे, ओम राजाराम कोठूळे, रसिका रामचंद्र झाडे, सुदर्शन साहेबराव कोठूळे, पूजा किसन गायकवाड, सतीश दत्ता वागतकर, नवनाथ रामजी मुकाडे, लक्ष्मण ज्ञानेश्वर खंदारे, साक्षी गोविंद डुडुळे, आकाश संतोष कोठूळे, कृष्णा सुभाष कोठूळे आणि समर्थ हनुमान कोठूळे या विद्यार्थ्यांनीही यश मिळवले आहे.
या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या कष्टकरी पालकांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे लोकसेवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष यशवंतराव वानोळे, आनंदराव वानोळे, दिगंबर डुकरे, लोभाजी झाडे, किशोर गायकवाड, बालाजी खूपसे, मारोती कोठुळे, किसन बुरकुले, संतोष वागतकर, बबनराव भिसे, शंकरराव बुलबुले, सोमाजी बुलबुले, तुकाराम ढोले, सुनील मारोती कोठूळे, बालाजीराव कोठूळे, काशिनाथ खंदारे, मंगल उत्तम भिसे, सखाराम भिसे, गजानन कोठूळे, सुजल संजय कोठूळे, आरती लोभाजी झाडे, रामचंद्र झाडे, संजय वानोळे, सोनाली वानोळे, कैलास ढोले, नागेश आमले, बालाजी झाडे यांच्यासह सरपंच, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक, अधिकारी व कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## दिव्यांग - निराधारांच्या अनुदानासाठी प्रहार संघटनेचा आंदोलनाचा इशारा

**मुदखेडे**-मुदखेड तालुक्यातील दिव्यांग लाभार्थांना संजय गांधी निराधार योजना,श्रावणबाळ सेवा राज्य निवृतीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग पेंन्शन योजनेचे अनुदान अनेक महिन्यापासून मिळाले नसल्याने दिव्यांग बांधवामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत प्रहार संघटनेचे मा. तालुका अध्यक्ष अनिल शेटे पा. व महिला अध्यक्ष सौ. केशरताई शिंदे पा. यांनी तहसीलदारांना अनेक निवेदन दिले आहे.
शासनाने दि.४ में २०२६ रोजी काढलेल्या परीपत्रकानुसार कोणताही दिव्यांग लाभार्थी योजनेपासून वंचित राहू नये असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.मात्र प्रत्यक्षात अनेक लाभार्थ्यांना तिन ते चार महिन्याचे अद्याप पेंन्शन मिळालेले नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. संस्थापक अध्यक्ष मा.आ. बच्चुभाऊ कडू यांनी शासन आदेशाची माहिती देत तात्काळ अनुदान वितरणाची मागणी केली तसेच दिव्यांग मंत्रालय सचिव तुकाराम मुंडे यांनी दिव्यांग बांधवांचे औषधोपचार शिक्षण व दैनंदिन खर्च या पेंन्शनवर अवलंबून असल्याने मोठ्या अडचणी निर्माण झाल्याचे सांगितले दरम्यान प्रलंबित अनुदान तातडीने वितरीत न झाल्यासं तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रहार संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष अनिल शेटे पा.यांनी दिला आहे.

## भोकर आणि लगळुद येथे महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी

**भोकर**-वीरशिरोमणी राष्ट्रवीर महाराणा प्रतापसिंह यांची जयंती भोकर शहरात आणि तालुक्यातील लगळुद येथे उत्साहात साजरी करण्यात आली.शहरातील नांदेड -म्हैसा वळण रस्त्यावरील महाराणा प्रतापसिंह चौकात आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास नगरसेवक साईप्रसाद जटलावार, नगराध्यक्ष प्रतिनिधी ड. विशाल दंडवे, अशोक निळकंठे,नगरसेवक प्रतिनिधी सिद्धेश्वर पिटलेवाड, मनोजसिंह चौहान, दिनेश तिवारी, गोविंदसिंह चौहान,करणी सेनेचे भोकर तालुकाध्यक्ष विक्रमसिंह चौहान,अतुल अन्नावार,दत्ता शिरळवाड,श्यामसिंह रघुवंशी शुभमसिंह रघुवंशी,आदर्शसिंह चंदेल, किशोर डोमपल्ले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.तर लगळुद येथे सकाळी ध्वजारोहण करून महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे ग्रामस्थांकडून पूजन करण्यात आले.यावेळी भिमसिंह चौहान, गंगारामसिंह तिलकचंद, नागोराव पा. कदम, यशवंतराव पाटील जाधव ,नामदेवसिंह ठाकूर ,मानसिंह तौर, महेश तीलकचंद, राज ठाकूर,रितेश तीलकचंद, शामसिंह चौहान,कपिल तौर, प्रसाद ठाकूर , प्रतापसिंह ठाकूर, अमरसिंह ठाकूर, देवीसिंह ठाकूर ,बंडूसिंग चंदेल, लक्ष्मणसिंह चौहान, धोंडूसिंह ठाकूर, चंद्रशेखर कदम यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



## राष्ट्रीय लोकअदालतीत २९ प्रकरणांचा सामंजस्याने निपटारा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ११ मे -**

येथील न्यायालयात शनिवारी (दि. ९) आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीत एकूण २९ प्रकरणांचा सामंजस्याने निपटारा करण्यात आला. यामध्ये बँकेशी संबंधित ११ तर इतर दिवाणी स्वरूपाची १८ प्रकरणे सामाविष्ट होती. या प्रक्रियेत बँकेच्या प्रकरणांतून ७ लाख ८५ हजार ५०० रुपये, तर न्यायालयीन प्रकरणांतून २ लाख ११ हजार १२३ रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती न्यायालय प्रशासनाकडून देण्यात आली.



राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे परस्पर संमतीने व तडजोडीच्या आधारावर निकाली काढण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे संबंधित पक्षकारांचा वेळ, पैसा व न्यायालयीन प्रक्रियेतील मानसिक त्रास मोठ्या प्रमाणात कमी झाला असून अनेकांना दिलासा मिळाला आहे. लोकअदालतीमुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेली प्रकरणे जलदगतीने निकाली निघण्यास मदत होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

या लोकअदालतीत पॅनल प्रमुख म्हणून दिवाणी न्यायाधीश पी. एम. माने यांनी काम पाहिले, तर पॅनल सदस्य म्हणून ॲड. दीपा सोनकांबळे यांनी सहकार्य केले. यावेळी सह दिवाणी न्यायाधीश के. जी. मेंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच न्यायालयातील वकिलांनी ही प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यासाठी सक्रिय सहकार्य केले.

## एकच व्यक्ती तेलंगणा व महाराष्ट्र राज्याचा लाभार्थी सदस्य

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ मे -**

जिल्हा मजूर फेडरेशनचा सदस्य असलेला एकच व्यक्ती तेलंगणा व महाराष्ट्र राज्यांमध्ये रहिवासी असल्याचे दाखवीत दोन्ही राज्यातील योजनांचा लाभ घेत आहे. एकाच व्यक्तीचा दोन राज्यांमध्ये स्वतंत्र आधार कार्ड, पॅन कार्ड व मतदार यादीमध्ये समावेश आहे. अशाप्रकारे शासनाची फसवणूक करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे स्वामी मुतपेल्लीवार यांनी केली आहे.

महाराष्ट्र राज्यातील बंजारा समाज तेलंगाना राज्यामध्ये अनुसूचित जमातीतील लबाना समाज म्हणून ओळखला जातो. नांदेड जिल्ह्यातील धूपसिंग मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था कोटंबा तालुका किनवटचे चेअरमन उत्तम धूपसिंग राठोड ( देवशोत) नांदेड जिल्हा मजूर फेडरेशनचे सदस्य आहेत. तेलंगाना राज्यांमध्ये अनुसूचित जमातीच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी सहकुटूंब मंजूळानगर ता.निर्मल तेलंगाना राज्य व नांदेड महाराष्ट्रातील मानसिंग तांडा ता.किनवट येथील स्वतंत्र आधार कार्ड, पॅन कार्ड व प्रॉपर्टीसह दोन्ही राज्यातील मतदार यादीत अधिकृत समावेश आहे.

तेलंगाना व महाराष्ट्र राज्याच्या मतदार यादीसह दोन्ही राज्यांमध्ये अधिकृत स्वतंत्र आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर कागदपत्रे तयार करून या व्यक्ती व कुटुंबाने शासनाची फसवणूक केली आहे असे सकृतदर्शनी दिसते. त्याचबरोबर तेलंगानाचे रहिवासी असताना महाराष्ट्रातील नांदेड जिल्हा मजूर फेडरेशनचे सदस्य झाले आहेत. या बाबीची चौकशी करून संबंधितांवर योग्य कारवाई करण्याची मागणी स्वामी नरसिंमलू मूतपेल्लीवार यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा निबंधक यांच्याकडे केली आहे.

## पत्रकांच्या माध्यमातुन देगलूर नगराध्यक्षांवर जुगार क्लब चालवण्याचा आरोप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ मे -**

नांदेडच्या देगलूर शहरात एका अज्ञात व्यक्तीने थेट नगराध्यक्ष आणि त्यांच्या कुटुंबीयांवर जुगार क्लब चालवण्याचे गंभीर आरोप करणारे पत्रक (पॉम्पलेट) छापून संपूर्ण शहरात वाटल्याची घटना समोर आली आहे. सध्या हे पत्रक रस्त्यावर पडलेल्या अवस्थेतील व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.




या पत्रकात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या देगलूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा तसेच त्यांचे पती बालाजी टेकाळे आणि भाऊ लक्ष्मण टेकाळे यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या खासगी जागेवर जुगार क्लब चालवला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच त्या ठिकाणी दारू व महिलांचीही व्यवस्था केली जात असल्याचा उल्लेख पत्रकात करण्यात आला आहे. हे पत्रक संपूर्ण देगलूर शहरात वाटण्यात आल्याचे सांगितले जात असून, त्यासंदर्भातील व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहेत. दरम्यान, देगलूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांनी या प्रकरणाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत तक्रार प्राप्त झाली नसल्याचे सांगितले. तसेच देगलूरमध्ये असा कोणताही प्रकार सुरू नसल्याची माहितीही त्यांनी दिली आहे. या घटनेमुळे सध्या संपूर्ण नांदेड जिल्ह्यात चर्चेला उधाण आले आहे.

## मुगाव येथे 'जागतिक गर्दभ दिन' साजरा

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ११ मे -**

येथील 'धर्मा डाँकी सेंचुअरी' संस्थेतर्फे शुक्रवार (दि.८) रोजी नायगाव तालुक्यातील मुगाव येथे 'जागतिक गर्दभ दिन' विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ५० गाढवांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. तसेच प्रत्येक गाढवाला हेड कॉलर लावून खाद्यही देण्यात आले.

अत्यंत कष्टाळू, संयमी आणि ग्रामीण जीवनातील वाहतूक व श्रम व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असलेल्या गाढव या प्राण्याबद्दल समाजामध्ये संवेदनशीलता निर्माण व्हावी, त्यांच्याप्रती सन्मानाची भावना वाढावी तसेच त्यांच्या आरोग्य, संवर्धन व संरक्षणाबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने दरवर्षी 'जागतिक गर्दभ दिन' साजरा केला जातो. दुर्लक्षित आणि अनेकदा उपेक्षित राहिलेल्या या प्राण्यांच्या कल्याणासाठी समाजाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्याची गरज असल्याचे संस्थेचे विश्वस्त अभिजीत महाजन यांनी यावेळी सांगितले.

दरवर्षी संस्थेतर्फे 'जागतिक गर्दभ दिन' वेगवेगळ्या गावांमध्ये साजरा करण्यात येतो. गतवर्षी हा उपक्रम आळंदी (ता. बिलोली) येथे पार पडला होता. तसेच 'सुदृढ व देखणा गाढव' स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असल्याने पशुपालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते. यावर्षी मुगाव येथे झालेल्या कार्यक्रमात गाढवांप्रती जिव्हाळा, माया आणि संवेदनशीलता जपणारे उपक्रम राबविल्याबद्दल पशुपालकांनी समाधान व्यक्त केले. पशुवैद्यक निहाल मुल्ला, भास्कर बुच्छलवार यांनी तपासणी करून औषधोपचार केले. अनन्यकश्यप प्रभाकर राव यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास परिसरातील पशुपालक उपस्थित होते.



## अपघातात निधन झालेल्या तरुणांच्या कुटुंबांची आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या कडून सांत्वन

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ११ मे -**

कंधार तालुक्यातील पानभोशी येथील राजेंद्र भोसीकर यांचा मुलगा नितीन व शिवाजीराव भोसीकर यांचा मुलगा विजय यांचा मंगरूळ ता.लोहा येथील घाटामध्ये अपघाती निधन झाले होते. यानिमित्त त्यांच्या परिवाराची लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा महाराष्ट्र विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी भेट घेऊन सांत्वन करण्यात आले.

यावेळी लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, कंधार नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, लोहा नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष करीम शेख, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, माजी नगराध्यक्ष स्वप्निल पाटील लुंगारे लोहा नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, कंधार खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष किशनराव डफडे, नगरसेवक समीर चाऊस, शासकीय कंत्राटदार सादलापुरे, सदाशिवराव नाईकवाडे यांच्या



अनेकांची उपस्थिती होती.

तसेच जुना लोहा शहरातील आकाश भिमराव शेटे यांचे काही दिवसापूर्वी अपघाती निधन झाले. तयानिमित्त जुना लोहा येथे भेट देऊन शेट्टे परिवाराची सांत्वन माजी खासदार तथा लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार पतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

यावेळी उपनगराध्यक्ष करीम शेख, गटनेते भास्कर पाटील पवार, माजी उपाध्यक्ष व नगरसेवक छत्रपती धुतमल, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, माजी नगरसेवक अप्पाराव पाटील पवार, नगरसेवक नारायण यल्लरवाड, नगरसेवक गणेश बगाडे, श्यामअण्णा पवार, माजी नगरसेवक बाबुराव डोम, नगरसेवक मंजलवाड, नगरसेवक तुकाराम दाढेल, नगरसेवक सतिष निखाते, दत्ता शेटे, काकाजी पवार, अनिल धुतमल, शहाजी पाटील पवार, गंगाधर महाबळे, मलकु आप्पा शेटे, बाळु शेटे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## सर्पदंशानंतर उपचाराअभावी आदिवासी शेतकऱ्याचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ११ मे -**

तालुक्यातील आंदबोरी (ची) येथील आदिवासी शेतकरी केरबा रावजी गारोळे (वय ५७) यांचा सर्पदंशामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी ग्रामीण आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सर्पदंशानंतर वेळेत योग्य उपचार न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप होत असून या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ९ मे रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या दरम्यान केरबा गारोळे हे आपल्या घरी जनावरांसाठी गोठ्यातून कडब्याची पेंडी काढत असताना त्यांना विषारी सापाने दंश केला. त्यानंतर त्यांची प्रकृती गंभीर बनल्याने कुटुंबीयांनी त्यांना ग्रामीण रुग्णालय गोकुंदा येथे दाखल केले. मात्र तेथे आवश्यक उपचार व वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना पुढील उपचारासाठी आदिलाबाद येथे हलविण्यात येत होते. दुर्दैवाने वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेची किनवट पोलीस स्टेशनमध्ये आकस्मिक मृत्यू क्रमांक १६/२०२६ कलम १९४ इछडड अन्वये नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार वाघमारे हे करीत आहेत.

दरम्यान, या गंभीर घटनेची दखल घेत काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते आकाश सुभाषराव जाधव यांनी मुख्यमंत्री मा. देवेन्द्र फडणवीस यांना निवेदन पाठवून या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, ग्रामीण व आदिवासी भागातील गरीब शेतकऱ्यांना वेळेत उपचार, सर्पदंशावरील प्रतिविष लस (पींळ डपरज्ञश तशपो) व आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना जीव गमवावा लागत आहे. मागील आठ दिवसांत किनवट तालुक्यात चार नागरिकांचा सर्पदंशामुळे मृत्यू झाला असूनही प्रशासन गांभीर्याने दखल घेत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

तसेच जिल्हा शल्यचिकित्सक नांदेड यांच्यावर निष्काळजीपणाचा ठपका ठेवत त्यांना तात्काळ निलंबित करून आरोग्य सचिवांमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

यासोबतच आदिवासी व ग्रामीण भागातील सर्व रुग्णालयांमध्ये सर्पदंशावरील लसी, आपत्कालीन उपचार सुविधा आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी तातडीने उपलब्ध करून द्यावेत तसेच मृत शेतकरी केरबा रावजी गारोळे यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत व योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या घटनेमुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून आदिवासी भागातील आरोग्य सुविधांबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.